# एकात्मीक बाल विकास सेवा योजना (जिल्हा कक्ष) विभाग, जिल्हा परिषद नाशिकच्या सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल

---

जा.क्र.स्था/३/ब/जिप/एबाविसेयो /नाशिक/८३८

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
नाशिक :- २
दिनांक :- ३.३.२००९

प्रेषक,
उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

नाशिक जिल्हा परिषदेच्या एकात्मीक बाल विकास योजना विभागाचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सं. क. गायकवाड, निवडश्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २१.१०.२००८ ते १७.१२.२००८ या कालावधीत पुर्ण केले. श्री. सु. ध. ठाकरे, प्रभारी लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी पुनर्विलोकन केले. श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी अहवालावर चर्चा करुन अंतिमीकरण दिनांक ७.२.२००९ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

अध्यक्ष :-

| | |
|---|---|
| श्री. राधाकिसन मारुती सोनवणे | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

मुख्य कार्यकारी अधिकारी :-

| | |
|---|---|
| श्री. ज्ञानेश्वर राजुरकर | ०१.०४.२००७ ते ३१.०३.२००८ |

<u>सभापती :-</u>

| | |
|---|---|
| सौ. मालतीताई को. आव्हाड | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

<u>उपमुख्य कार्यकारी  अधिकारी (बा.क) :-</u>

| | |
|---|---|
| श्री. एस. आर. वाडेकर | ०१.०४.२००७ ते १०.०६.२००८ |
| श्रीमती. पी. एस. संगमनेरे | ११.०६.२००७ ते ३१.०३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण )

मागील लेखा परीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्र पत्र व्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | परि. संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९९२-९३ | ६,५२,५४,६१,८२,८४,१२९,१३५,११८ | ९ |
| २ | १९९३-९४ | ५६,६६,६७,९५,९६,११२ | ६ |
| ३ | १९९४-९५ | १३,२१,३८,३९,४२,५२ | ६ |
| ४ | १९९५-९६ | ३,१०,३८,४१,४४,४८(१,३) | ६ |
| ५ | १९९६-९७ | ३(ब),१२,२४,२६,२७,३१,३९,४८(पेठ व दिंडोरी वगळून) | ८ |
| ६ | १९९७-९८ | ७,२६,२९,३१,३२,३७ | ६ |
| ७ | १९९८-९९ | १६,१९ | २ |
| ८ | १९९९-२००० | ३,९<br>पंचायत राज लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.३ :- अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी/जादा खर्च करणेबाबत (३.३२९(६) | २ |
| ९ | २०००-२००१ | ३,११,१२,१५(हरसूल व बागलाण वगळून) | ४ |
| १० | २००१-२००२ | ३,६,७,११,१२,२१,२२,२५,२८, (येवला व सिन्नर वगळून)<br>पंचायत राज लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि. क्र.७ :- अंगणवाडी इमारत बांधकाम ३.५२३(१०) | ९ |
| ११ | २००२-२००३ | ६,८,१०,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२७,२९ | १२ |
| १२ | २००३-२००४ | ३,४,५,६,९,११,१२(१),१३(१.२),१४,१५,१७<br>पंचायत राज लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.४ :- पुरक पोषण आहार पुरविणेबाबत.(३.५३२)<br>परि.क्र.११ :- थेरेपेटेक्स पुरक पोषण आहार पुरविणेबाबत. (३.५३३) | ११ |
| १३ | २००४-२००५ | ३,४,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१९,२०,२१,२२,२३, २४,२५<br>पंचायत राज लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.१९ :- प्रकल्पांना अंगणवाडी साहित्य व नोंदवह्या वाटपाबाबत. (३.५५८) | २१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | २००५-२००६ | ३(अ,ब),४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१९,२०,<br>२१,२२,२३,२५<br>पंचायत राज लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र.२२ :- महिलांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांमार्फत<br>अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहार पुरवठा करणेच्या<br>योजनांतील अनियमितता. (३.१३०९) | २१ |
| १५ | **लेखापरिक्षण अहवाल सन २००६ – २००७** | | |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ४ :- प्रोटोव्हिटा आहार पुरवठा योजनेतील संशयित गैरव्यवहाराबाबत.<br>(मालेगाव गट) |
| परिच्छेद क्रमांक ५ :- प्रोटोव्हिटा आहार पुरवठा योजनेतील अनियमिततेबाबत. (मालेगाव गट) |
| परिच्छेद क्रमांक ६ :- सुक्ष्म नियोजन प्रकल्प (सुरगाणा) मधील अनियमिततांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ७ :- मंजूर पदांपेक्षा जादा अतिरिक्त पदांवरील वेतनखर्चाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ८ :- एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत मंजूर असलेल्या पदांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ९ :- एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प – निफाड अंतर्गत<br>अंगणवाड्यांमार्फत बचत गटांना स्वस्त धान्य दुकानांमार्फत आहार साहित्य<br>पुरवठा योजनेतील दुबार रक्कम प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १० :- पुरक आहारासाठी तांदुळ खरेदी व वाहतूक |
| परिच्छेद क्रमांक ११ :- मागणीपेक्षा जास्त पुरवठा केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १२ :- पोषण आहाराचा कमी पुरवठा केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १३ :- उपचार शास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील जादा रक्कम प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १४ :- उपचार शास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील अनियमिततांबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १५ :- उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील अनियमिततेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १६ :- उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील जादा रक्कम प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक १७ :- महिला बचत गटांमार्फत पोषण आहार पुरवठा योजनेतील तृटींबाबत.<br>(पंचायत समिती इगतपुरी, जिल्हा नाशिक) |
| परिच्छेद क्रमांक १८ :- महिला बचत गटांमार्फत पोषण आहार पुरवठा योजनेतील तृटींबाबत.<br>(त्र्यंबक व हरसूल गट) |
| परिच्छेद क्रमांक १९ :- महिला बचत गटांमार्फत पोषण आहार पुरवठा योजनेतील<br>अनियमिततांबाबत. (पंचायत समिती चांदवड) |
| परिच्छेद क्रमांक २० :- महिलांच्या स्वयं सहाय्यता बचत गटांमार्फत अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना<br>पुरक पोषण आहार पुरवठा करणेच्या योजनेतील तृटींबाबत.(सुरगाणा गट) |
| परिच्छेद क्रमांक २१:- महिलांच्या स्वयं सहाय्यता बचत गटांमार्फत अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना<br>पुरक पोषण आहार पुरवठा करणेबाबत.. |
| परिच्छेद क्रमांक २२:- महिलांच्या स्वयं सहाय्यता बचत गटांमार्फत अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना<br>पुरक पोषण आहार पुरवठा करणच्या योजनांतील अनियमिततांबाबत....<br>(पंचायत समिती निफाड) |

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक २३ :- बचतगटांनी पुरक पोषण आहार पुरविणे संदर्भात झालेल्या अनियमिततेबाबत.. (पंचायत समिती दिंडोरी) |
| परिच्छेद क्रमांक २४ :- उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील अनियमिततेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २५ :- शालेय पोषण आहार योजना खर्चाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २६ :- आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणा-या अधिकारी व कर्मचारी यांना जादा प्रकल्प भाडे/अतिरिक्त घरभाडे प्रदानाबाबत व प्रोत्साहन भत्त्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २७ :- सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे वेतनवाढी अदा केल्याबाबत..... |
| परिच्छेद क्रमांक २८ :- सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे वेतनवाढी प्रदान केल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक २९ :- सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे पुढील वेतनवाढी दिल्याबाबत.... |
| परिच्छेद क्रमांक ३० :- सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे पुढील वेतनवाढी दिल्याबाबत.... |
| परिच्छेद क्रमांक ३१ :- सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे पुढील वेतनवाढी दिल्याबाबत.... |
| परिच्छेद क्रमांक ३२ :- वाहनचालकास दिलेल्या चुकीचे एकस्तर पदोन्नतीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३३ :- वाहनचालक यांना एकस्तर पदोन्नती वेतनश्रेणी चुकीची लागू केल्याने झालेले जादा प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३४ :- कालबध्द पदोन्नती चुकीची वेतनश्रेणी दिलेने जादा प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३५ :- श्रीमती. एम. टी. भवर, मुख्य सेविका, गिरणारे यांना चुकीची एकस्तर पदोन्नती दिल्याने वेतन व भत्ते जादा प्रदानाबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३६ :- श्री. बी. पी. सांगळे, वाहनचालक यांना प्रदान केलेल्या अतिकालिक भत्त्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३७ :- अंगणवाडी केंद्र इमारत बांधणे |
| परिच्छेद क्रमांक ३८ :- चलनपावती उपलब्ध न केलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ३९ :- साठा नोंदवहीत नोंद नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ४० :- दुरध्वनी देयके उशिरा भरलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ४१ :- स्टेशनरी खरेदी साठा नोंदवहीत नोंद नसलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक ४२ :- आक्षेप विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक ४३ :- विवरणपत्र |
| परिच्छेद क्रमांक ४४ :- अनुपालन व पोहच |



टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतिम समजण्यात यावेत.

## भाग दुसरा
## (चालु लेखा परीक्षण)

---

### स्थानिक क्षेत्र

### मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता.

(जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यात आले आहे, असे प्रदान.)

**निरंक**

---

### मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ब ) खालील अनियमितता.

(कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले नुकसान.)

**निरंक**

---

### मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( क ) खालील अनियमितता.

(एखादया व्यक्तीस तिला मिळालेली रक्कम लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक होते, परंतु जी अशी दाखविण्यात आली नाही, अशी रक्कम.)

**निरंक**

---

### मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ड ) खालील अनियमितता.

(अ,ब,क,व्यतिरिक्त लेख्यामध्ये आढळुन आलेल्या इतर अनियमितता.)

**निरंक**

---

## शासकीय क्षेत्र

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( अ ) खालील अनियमितता.

(जे प्रदान वैधानिक तरतुदी विरुध्द करण्यात आले आहे, असे प्रदान.)

---

### परिच्छेद क्रमांक १ :- अंदाजपत्रकाबाबत.

पुढील बाबींवर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा व प्राप्त अनुदानापेक्षा कमी खर्च केलेला आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | लेखशिर्ष | उपाययोजना | तरतुद रक्कम | खर्च रक्कम | कमी / जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अ | २२३६००७२ | आस्थापना अनुदान | ६,८९,४९,००० | ६,७५,३२,३०३ | १४,१६,६९७ |
| १ | | किशोरी शक्ती योजना | ५,९३,१०० | ५,८८,२१४ | ४,८८६ |
| २ | | औषधी संच खरेदी | २३,७६,००० | ० | २३,७६,००० |
| ३ | | औषधी संच खरेदी(०६) | २२,०५,००० | २२,०४,५८० | ४२० |
| | २२३६००७२ | **एकूण** | **७,४१,२३,१००** | **७,०३,२५,०९७** | **३७,९८,००३** |
| ब | २२३६००२७ | वाढीव मानधन | १,०१,६०,००० | १,०१,४४,५१० | १५,४९० |
| | | स्थानिक आहार | ४,९२,९०,००० | ४९,२१,७०,००३ | ७२,९९७ |
| | | उपचार शास्त्रंभूत आहार | १,६०,००,००० | १,५८,७३,९२४ | १,२६,०७६ |
| | | भाऊबीज भेट | २४,४४,५०० | २३,६६,३७५ | ७८,१२५ |
| | २२३६००२७ | **एकूण** | **७,७८,९४,५००** | **७,७६,०१,८१२** | **२,९२,६८८** |
| क | २२३६००६३ | स्थानिक आहार | ७२,००,००० | ७१,२९,४६८ | ७०,५३२ |
| | | उपचार शास्त्रंभूत आहार | ६४,५०,००० | ५३,४२,५४६ | ११,०७,४५४ |
| | २२३६००६३ | **एकूण** | **१,३६,५०,०००** | **१,२४,७२,०१४** | **११,७७,९८६** |
| | | **एकंदर** | **१६,५६,६७,६००** | **१६,०३,९८,९२३** | **५२,६८,६७७** |
| ड | २२३६०२९७ अर्थोपाय स्वरुपात अनुदान | आदिवासी उपयोजनेतंर्गत नवीन अंगणवाडी निर्मितीसाठी | ४,२४,८८,००० | १,९३,८७,००० | २,३१,०१,००० |
| | | **एकंदर** | **२०,८१,५५,६००** | **१७,९७,८५,९२३** | **२,८३,६९,६७७** |

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/१०८९/ प्र.क्र. १५९०/२५/दिनांक २५.१०.१९८९ अन्वये अनुदान निर्धारणाची वाट न पहाता अखर्चित रक्कमा कोषागारातून जमा करणेबाबत निर्देश असतांना तशी कार्यवाही पूर्णपणे केलेली नाही. त्वरीत शासनाकडे भरणा करुन विलंबाबाबत शासनाचे क्षमापनासह अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

<u>परिच्छेद क्रमांक २ :- बेकायदेशीर फोल्डींक काथ्याच्या गाद्या खरेदीबाबत...</u>

एकात्मिक बालविकास योजना विभाग, जिल्हा परिषद, नाशिकचे सन २००७ - २००८ चे लेखापरीक्षण केले असता आदिवासी प्रकल्पांतील अंगणवाडीतील मुलांना बसणेसाठी फोल्डींक काथ्याच्या गाद्या खरेदी केलेल्या आहेत.

खरेदी व प्रदानाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रमाणक क्रमांक व दिनांक | ४०१/३१.३.२००८ |
| खर्च रक्कम रुपये | ७१,००,२८३/- |
| तपशिल | काथ्या मित्र मंडळ, ठाणे यांचेकडून फोल्डींक काथ्याच्या गाद्या ३३६८ नग खरेदी केलेले आहे. |
| | प्रति नग किंमत रुपये २१०८.१६ |
| | साईज - ९ X १.२ X २ जाडी |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना नाशिकने आदिवासी उपयोजनांतर्गत अंगणवाडी आस्थापना सेविका मानधन, बचतगटांना आहार शिजविण्यासाठी देण्यांत येणारी मजूरी ह्या शिर्षाखाली सन २००७ - २००८ मध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानांतून रक्कम वर्ग करुन नियमबाह्य रक्कम रुपये ७१,००,२८३/- ची खरेदी केलेली आहे.

एकात्मिक बालविकास योजना विभागाचे मुळ अंदाजपत्रक तपासणी केले असता त्यामध्ये फोल्डींग काथ्याच्या गाद्या खरेदी करण्यांबाबतची मागणी केलेली नाही.

२) आदिवासी उपयोजनांतर्गत अंगणवाडी सेविका मानधन, बचतगटांना आहार शिजवून देण्यापोटी देण्यांत येणारी मजूरी व नविन अंगणवाडी निर्मितीवरील खर्चासाठी सन २००७ - २००८ मध्ये रक्कम रुपये ४,२४,८८,०००/- अनुदान प्राप्त झालेले होते. त्यांपैकी मार्च २००८ अखेर पावेतो रक्कम रु. १,९३,८७,०००/- खर्च झालेले असून रक्कम रुपये २,३१,०१,०००/- अद्यापपावेतो जिल्हा परिषदेकडे शिल्लक आहे.

शासनाकडून ज्या बाबींसाठी अनुदान प्राप्त झालेले असते त्याच बाबींसाठी खर्च करणे आवश्यक असतांना महिला व बालविकास विभागाने सदरचे अनुदान आदिवासी विभागाच्या व वित्त विभागाच्या पूर्व संमतीशिवाय खर्च केलेले आहे, फोल्डींग गाद्या खरेदीसाठी वापरलेले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, एकात्मिक बाल विकास योजना यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांना लिहीलेले पत्र क्रमांक नाजिप/एबासविसंयो/१४७/०८ दिनांक ७.३.२००८ नुसार तांत्रिक मान्यता मिळविण्यासाठी पत्र दिलेले होते. त्या पत्रास अनुसरुन मा. प्रकल्प अधिकारी, नाशिक यांचे पत्र क्रमांक नियोजन-०८/का-६(१)/जिवायो/आऊयो दिनांक १७.३.२००८ नुसार असे कळविलेले आहे की, सदर खरेदीची बाब ही ''शासन स्तरांवरील धोरणात्मक बाब'' असल्याने सदरचे खरेदीबाबत शासनाकडे पाठपुरावा करावा.

असे असतांना सुध्दा एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागाने शासनाकडे प्रस्ताव सादर न करताच त्यांचे आदेश क्र. नाजिप/एबाविसयो/सासं/११५/२००८ दिनांक १९.३.२००८ रोजी पुरवठा आदेश देऊन काथ्या मित्र मंडळ, ठाणे यांच्याकडून रक्कम रुपये ७१,००,२८३/- ची खरेदी केलेली आहे.

४) कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांचे पत्र दिनांक २९.३.२००८ अन्वये खरेदी प्रस्तावास मान्यता असल्याचे दिनांक १९.३.२००८ च्या पुरवठा आदेशात नमुद केलेले आहे. म्हणजेच प्रस्तावास मान्यता मिळण्यापूर्वीच पुरवठा आदेश देऊन शासनाची दिशा भूल केल्याचे स्पष्ट होते. कार्यासन अधिकारी यांचे दिनांक २९.३.२००८ चे पत्राचे अवलोकन केले असता सदरच्या पत्रात 'संदर्भांकित पत्रान्वये पाठविलेल्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येत आहे' असे एकच वाक्य लिहिलेले असून सदर पत्राच्या प्रती इतर संबंधित कार्यालयांस अग्रेषित नाहीत.

शासन परिपत्रक क्र. मुविनि-१०९५/प्र.क्र.५/विनिमय दिनांक ३१.३.१९९५ नुसार कोणत्याही प्रस्तावास मंजूरी देतांना त्यामध्ये वित्तीय प्राधिकार, खर्चाचे लेखाशिर्ष, खर्चाचे आर्थिक वर्ष, तरतुदीची रक्कम इत्यादी बाबींचा समावेश असणे, कोषागारातून रक्कमा आहरीत करण्यासाठी कोषागारास व आर्थिक वर्षाचे खर्चाचे अंतिमीकरण होणेकामी मा. महालेखापाल, मुंबई यांना आदेशाची प्रत अग्रेषित करणे बंधनकारक आहे. तसेच अशा धोरणात्मक बाबीवर खर्च करण्यापूर्वी " वित्त विभागाची संमती " घेणे बंधनकारक असतांना अशी कुठलीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे कार्यासन अधिकारी यांनी दिलेले दिांक २९.३.२००८ चे पत्र हे शासनाची मंजूरी आदेश म्हणून वैध आहेत काय ? याबाबत मा. सचिव, वित्त विभाग यांचे अभिप्राय घेतले जावेत.

५) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१०००/प्र.क्र.१४/कोष -४ दिनांक ११.२.२००० नुसार १५ फेब्रुवारी नंतर कोणत्याही प्रकारची खरेदी करुन नये असे आदेश असतांना माहे मार्च २००८ अखेर खरेदी झाले आहे.

६) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास शासन निर्णय क्र. मबावि-२००६/प्र.क्र.११९/ क-८ दिनांक ३०.६.२००६ नुसार सन २००६ - २००७ साठी आदिवासी क्षेत्रातील अंगणवाड्यांसाठी शासन स्तरावरुन रक्कम रुपये ५,०३,०८,८००/- खर्च करुन काथ्याच्या फोल्डींग गाद्या खरेदी करुन प्रत्येक अंगणवाडीस वाटप केलेल्या आहेत. याअंतर्गत नाशिक जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील कोणत्या अंगणवाडीसाठी किती काथ्याच्या फोल्डींग गाद्यांचा पुरवठा केलेला आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १ दिनांक १२.१.२००९ व स्मरण पत्र क्रमांक २ दिनांक १६.१.२००९, क्रमांक ३ दिनांक २१.१.२००९ नुसार माहितीची मागणी केली असता 'सदरची माहिती या कार्यालयाशी निगडीत नाही असे विलंबाने म्हणजेच दिनांक २३.१.२००९ रोजी दिलेल्या उत्तरात नमुद केलेले आहे.' मात्र प्रारुप आक्षेपांच्या उत्तरामध्ये प्रकल्प स्तरावरील एकूण लाभार्थी यांना यापूर्वी पुरविणेत आलेल्या काथ्याच्या गाद्यांविषयी अद्यावत तपशील जिल्हा स्तरावर उपलब्ध आहे अशी माहिती सादर केलेली आहे.

वरील दोन्ही बाबींची पडताळणी केली असता लेखापरीक्षणाची दिशाभूल केल्याचे स्पष्ट होते.

७) सदर खरेदी करण्यापूर्वी अंगणवाड्यांचे चटई क्षेत्र व विद्यार्थी या निकषांनुसार आवश्यकता ठरविलेली नाही. ज्या अंगणवाड्यांसाठी सन २००६ - २००७ मध्ये फोल्डींग

गाद्यांचा पुरवठा केलेला आहे. त्याच अंगणवाडयांना सन २००७ - २००८ मध्येही पुरवठा केलेला आहे, असे दिसून येते. मात्र संबंधित अंगणवाड्यांकडील पोहच पावती घेण्यात आलेली नाही.

८) महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र. भारप/काथ्याच्या वस्तु/दर निश्चिती/(३१)/०७/०८/२९८८ दि. २२.१.२००८ नुसार मागणीकार कार्यालयाने काथ्याच्या वस्तुंचा पुरवठा आदेश इतर कोणत्याही कंपनी अथवा संस्था यांचे नावे निर्गमित न करता ''महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, जिल्हा सिंधुदुर्ग'' यांच्या नावाने निर्गमित करावा असे असतांना 'काथ्या मित्र, ठाणे' यांचे नावे पुरवठा आदेश देऊन एकात्मिक बाल विकास, नाशिक यांनी गंभीर अनियमितता केली आहे.

९) महाराष्ट्र शासन, महिला व बालकल्याण विभाग, शासन निर्णय क्र. एबावि २००७/प्र.क्र.८२/का-६/दिनांक १६.१०.२००७ अन्वये नाशिक जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यांमध्ये खालीलप्रमाणे ४२४ नविन अंगणवाड्यांसाठी मंजूरी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १ | सुरगाणा | ६४ |
| २ | दिंडोरी | ९० |
| ३ | हरसुल | १३४ |
| ४ | नाशिक | ९० |
| ५ | पेठ | ४६ |
| | **एकूण** | **४२४** |

कार्यालयीन टिपण्णी दिनांक ७.३.२००८ मध्ये उपरोक्त शासन निर्णयानुसार प्रत्येक नविन अंगणवाडीसाठी ६ बस्कर पट्ट्या खरेदी करण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार २५४४ बस्कर पट्ट्या खरेदी करणे आवश्यक होते. तथापि खालीलप्रमाणे जादा बस्कर पट्ट्या खरेदी केल्या आहेत.

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | मंजूर अंगणवाडी संख्या | बस्कर पट्ट्यांप्रमाणे खरेदी | केलेली खरेदी | जादा खरेदी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुरगाणा | ६४ | ३८४ | ७०८ | ३२४ |
| २ | दिंडोरी | ९० | ५४० | ५८५ | ४५ |
| ३ | हरसुल | १३४ | ८०४ | ४६३ | - |
| ४ | नाशिक | ९० | ५४० | ५४० | - |
| ५ | पेठ | ४६ | २७६ | ३०० | २४ |
| ६ | त्र्यंबक | - | - | २८१ | २८१ |
| ७ | इगतपुरी | - | - | २६६ | २६६ |
| ८ | कळवण | - | - | ९५ | ९५ |
| ९ | बागलाण | - | - | १३० | १३० |
| | **एकूण** | **४२४** | **२५४४** | **३३६८** | **११६५** |

शासन निर्णय दिनांक १६.१०.२००७ अन्वये नविन अंगणवाड्यांना मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार नविन अंगणवाडीची स्थापना केव्हा झाली? एकूण विद्याथी संख्या? इमारतीचे चटई क्षेत्र इत्यादी प्रकारची शास्त्रशुध्द माहिती संकलीत करुन त्याआधारे मागणी निश्चित केलेली नाही.

१०) एकात्मिक बाल विकास विभागाने आदिवासी उपयोजनेतंर्गत सन २००७ - २००८ मध्ये कोणत्या योजना राबविल्या आहेत याबाबतची माहिती महिला व बालकल्याण समिती, स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यांना देणे बंधनकारक असतांना सदरच्या खरेदीबाबतची माहिती संबंधित समितीला दिलेली नाही. त्यामुळे संबंधित स्थानिक पदाधिका-यांना आदिवासींच्या कल्याणाकरीता राबविलेल्या योजनांची माहिती मिळालेली नाही. ही बाब शासनाच्या विकेंद्रीकरण धोरणाच्या विरुध्द आहे.

११) मार्च २००८ अखेर प्राप्त झालेले अनुदान, खर्च केलेले अनुदान व शिल्लक अनुदान यांचा मेळ घेऊन शासन स्तरावरुन समायोजन आदेश निर्गमित होणे आवश्यक आहे. मात्र सदरच्या खर्चाचे समायोजनाचे आदेश अद्यापपावेतो निर्गमित झालेले नाहीत. म्हणजेच सदरच्या खर्चाचा तपशिल शासनास अद्याप पावेतो सादर केल्या नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे आजअखेर रुपये २,३१,०१,०००/- अनुदान पडून आहे. म्हणजेच सदोष अंदाजपत्रक सादर केले जात आहे.

१२) प्रारुप आक्षेपातील क्रमांक ६ मध्ये मंजूरी आदेशापूर्वीच पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत असे नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे उत्तरात दाखल केलेल्या मजकुरात एकात्मिक बाल विकास विभागाने नजरचुकीने पुरवठा आदेशावर दिनांक १९.३.२००८ टाकल्याचे नमुद केलेले आहे. कार्यालयीन टिपण्णी मंजूरीचा दिनांक २९.३.२००८ आहे. मात्र नियमित अनुदान उपलब्ध नसणे, सक्षम प्राधिका-याची मंजूरी नसणे, वित्त विभागाची मंजूरी न घेणे, तारखेत खाडाखोड व उपरीलेखन करणे व संबंधित अंगणवाड्यांची मागणी नसतांना शेवटच्याक्षणी दिनांक ३१.३.२००८ रोजी पुरवठा करुन देयक प्रदान करणे, अर्धसमास पत्रास विसंगत उत्तरे सादर करणे इत्यादी सर्व कृती शासन नियमाच्या विसंगत आहे.

वरील सर्व अनियमिततांचा विचार करता याबाबत मा. विभागीय आयुक्त यांचे स्तरावर चौकशी करुन उपआक्षेप ८ बाबत शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे अभिप्रायानुसार उचित प्रशासकीय कारवाई व्हावी व संपूर्ण कार्यवाही अहवालासह पुर्तता दर्शवावी. तोपर्यंत रक्कम रुपये ७१,००,२८३/- शासकीय अनुदानासाठी अंतिम अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
२२३६ अर्थोपाय अनुदान,
आदिवासी उपयोजनेअंतर्गत
नविन अंगणवाडी निर्मिती
अंतिम अमान्य रक्कम रुपये ७१,००,२८३/-

---

## परिच्छेद क्रमांक ३ :- महिलांच्या स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत अंगणवाड्यांतील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहार पुरवठा करणेबाबत.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठा कार्यपध्दतीत सुधारणा करणेबाबत महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि/२००४/प्र.क्र.२३३/का-५, नविन प्रशासन भवन, तिसरा माळा, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २८.१०.२००५ अन्वये शासन निर्णय निर्गमित करणेत आला आहे.

या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिक क्र. १९६/२००१ मध्ये दिनांक ७ ऑक्टोंबर २००४ रोजी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत पुरक पोषण आहाराचा पुरवठा ठेकेदारामार्फत करणेत येऊ नये. पुरक पोषण आहार पुरवठ्याचे व आहार शिजविण्याचे काम ग्राम समुदाय / स्वयंसहाय्यता बचत गट आणि महिला मंडळे यांचेमार्फत करणेत यावेत असे आदेश दिलेले आहे.

उपरोक्त आदेशातील अट क्रमांक ७ नुसार आहार पुरवठा करणेसाठी महिला मंडळे म्हणजे महिला संस्था असून सदर संस्थेचे सर्व संचालक / विश्वस्थ / सदस्य हे महिला असणे आवश्यक आहे. तिची सार्वजनिक विश्वस्थ कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६०, महाराष्ट्र राज्य सह. संस्था अधिनयम १९६० किंवा कंपनी अधिनियम १९५६ यांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली असावी.

वरील आदेशाप्रमाणे तालुक्यात एकूण ३८१ अंगणवाड्यांना जिल्हा समिती स्तरावरुन महिला स्वयं सहाय्यता बचत गटांना मंजूरी प्राप्त झालेली आहे.

| बचत गट | मंजूर अनुदान | एकूण खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|
| बचत गट जूने अंगणवाडी केंद्र | ३३,००,००० | ३३,००,००० | निरंक |
| बचत गट नवे | ३,००,००० | ३,२९,६५३ | २९,६५३ |
| एकूण | ३६,००,००० | ३६,२९,६५३ | २९,६५३ |

मार्च अखेर महिला स्वयं सहाय्यता बचत गटांसाठी आहाराचा पुरवठा करुन दिल्याबाबत एकूण खर्च रुपये ३६,२९,६५३/- एवढा बाल विकास प्रकल्प यांचे स्तरावर करणेत आलेला आहे. तसेच दिनांक ६.९.२००७ पासून कोषागारातून देयके पारीत होत आहेत.

या संदर्भात खालील तृटी नमुद करणेत येत आहेत:

१) उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक ७ नुसार सदरचे बचत गट हे सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १९६० महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेबाबत आवश्यक ते दस्तऐवज लेखापरीक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

२) बचत गटांची देयके या महिन्यानंतर पुढील महिन्याच्या जास्तीत जास्त १० तारखेपर्यंत बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी देयके अदा करावीत. या संदर्भात अट ९.३ नुार या योजनेतंर्गत पुरक पोषण आहाराच्या खर्चासाठी शासनाकडून निधी वितरणास अपवादात्मक परीस्थितीत काही कारणांमुळे विलंब झाल्यास जिल्हा परिषदेने जिल्हा निधीतून आगाउ रक्कम

खर्च करणेत यावी आणि महिला बचत गट / महिला मंडळे यांनी केलेल्या आहार पुरवठयाची देयके अदा करावी. असे नमुद असतांनाही संबंधित बचत गटांना १० तारखेच्या आत रक्कम प्रदान करणेत आलेली नाही. जसे अनुदान प्राप्त झालेले आहे त्याप्रमाणे अर्थ सहाय्य प्रदान करणेत आलेले आहे. वरील अटिंचे जिल्हा परिषद व पंचायत स्तरावर पालन करणेत आलेले नाही.

३) शासन निर्णयातील अट क्रमांक ६.४ नुसार बचत गटातील सर्व सदस्य महिला असणे आवश्यक आहे असे नमुद असतांना बचत गटाचे सर्व सदस्य महिला असाल्याचे साधार प्रमाणात करावे.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता करुन अनुपालन लेखा परिक्षणास दर्शवावे तोपर्यंत सदरचा खर्च रुपये ३६,२९,६५३/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ३६,२९,६५३/-
२२३६,पोषण आहार पोषण
अन्न पेये यांचे वितरण,
१०१ विशेष आहार
पं.स.येवला

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- महिलांच्या स्वंयसहायता बचत गटामार्फत अंगणवाडयातील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहार पुरवठा करणेबाबत.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठा कार्यपध्दतीत सुधारणा करणेबाबत महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि/२००४/प्र.क्रं.२३३/का-५ नविन प्रशासनभवन ३ रा माळा मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २८.१०.२००५ अन्वये शासन निर्णय निर्गमित करणेत आला आहे.

या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचीका क्रं. १९६/२००१ मध्ये दिनांक ७ ऑक्टोबर २००४ रोजी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहाराचा पुरवठा ठेकेदारामार्फत करणेत येउ नये. पुरक पोषण आहार पुरवठयाचे व आहार शिजविण्याचे काम ग्राम समुदाय / स्वंयसहायता बचत गट आणि महिला मंडळे यांचेमार्फत करणेत यावेत असे आदेश दिलेले आहे.

उपरोक्त आदेशातील अट क्रं. ७ नुसार आहार पुरवठा करणेसाठी महिला मंडळे म्हणजे महिला संस्था असुन सदर संस्थेचे सर्व संचालक / विश्वस्थ / सदस्य हे महिला असणे आवश्यक आहे. तिची सार्वजनिक विश्वस्थ कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६०, महाराष्ट्र राज्य सह. संस्था अधिनियम १९६० किवा कंपनी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली असावी.

वरील आदेशाप्रमाणे तालुक्यात एकुण ३८१ अंगणवाडयांसाठी जिल्हा समिती स्तरावरुन महिला स्वयं सहायता बचत गटांना मंजुरी प्राप्त झालेले आहे.

| बचत गट | मंजुर अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|
| बचत गट जुने अंगणवाडी केंद्र | ३९,५९,००० | ३९,२८,१५० | ३०,८५० |
| बचत गट नवे | ६,५०,००० | ६,३७,९२७ | १२,०७३ |
| **एकुण** | **४६,०९,०००** | **४५,६६,०७७** | **४२,९२३** |

मार्च अखेर महिला स्वंय सहायता बचत गटांसाठी आहाराचा पुरवठा करुन दिल्याबाबत एकुण खर्च रुपये ४५,६६,०७७/- एवढा बालविकास प्रकल्प यांचे स्तरावर करणेत आलेला आहे. तसेच दिनांक ६.०९.२००७ पासून कोषगारातून देयके पारीत होत आहेत. या संदर्भात खालील त्रुटी नमुद करणेत येत आहे.

१) उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रं. ७ नुसार सदरचे बचत गट हे सार्वजनिक विश्वस्त कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६० महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किवा कंपणी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेबाबत आवश्यक ते दस्तऐवज परिक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

२) बचत गटांची देयके या महिन्यानंतर पुढील महिन्याच्या जास्तीत जास्त १० तारखेपर्यंत बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी देयके अदा करावीत या संदर्भात अट ९.३ नुसार या योजनेअंतर्गत पुरक पोषण आहाराच्या खर्चासाठी शासनाकडुन निधी वितरणास अपवादात्मक परीस्थितीत काही कारणांमुळे विलंब झाल्यास जिल्हा परिषदेने जिल्हा निधीतून आगाउ रक्कम खर्च करणेत यावी आणि महिला बचत गट/ महिला मंडळे यांनी केलेल्या आहार पुरवठयाची देयके अदा करावी. असे नमुद असतांनाही संबधित बचत गटांना १० तारखेच्या आत रक्कम प्रदान करणेत आलेली नाही. जसे अनुदान प्राप्त झालेले आहे त्याप्रमाणे अर्थ सहाय्य प्रदान करणेत आलेले आहे. वरील अटींचे जिल्हा परिषद व पंचायत स्तरावर पालन करणेत आलेले नाही.

३) शासन निर्णयातील अट क्रमांक ६.४ नुसार बचत गटातील सर्व सदस्य महिला असणे आवश्यक आहे असे नमुद असतांना बचत गटाचे सर्व सदस्य महिला असल्याचे साधार प्रमाणित करावे.

उपरोक्त अभिप्रायाची पुर्तता करुन अनुपालन लेखा परिक्षणास दर्शवावे तोपर्यंत सदरचा खर्च रुपये ४५,६६,०७७/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

तात्पुरती अमान्य रक्कम ४५,६६,०७७/-
२२३६, पोषण आहार पोषण
अन्न पेये यांचे वितरण,
१०१ विशेष आहार
पं.स. निफाड

---

## परिच्छेद क्रमांक ५ :- महिलांच्या स्वयंसहायता बचत गटामार्फत अंगणवाडयातील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहार पुरवठा करणेबाबत...

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठा कार्यपध्दतीत सुधारणा करणेबाबत महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक/एबाविसेयो/२००४/प्र.क्र./२३३/का-५/नविन प्रशासन भवन ३ रा मजला मंत्रालय मुंबई-३२ दिनांक – २८.१०.२००५ अन्वये शासन निर्णय करणेत आला आहे.

या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचीका क्रमांक/१९६/२००१ मध्ये दिनांक ७ ऑक्टोबर २००४ आहाराचा पुरवठा ठेकेदारामार्फत करणेत येवु नये पुरक पोषण आहार पुरवठयाचे व आहार शिजविणेचे काम ग्रामसमुदाय/ स्वयंसहायता बचत गट आणि महिला मंडळे यांचेमार्फत करणेत यावेत असे आदेश दिलेले आहे.

उपरोक्त आदेशातील अट क्रमांक-७ नुसार पुरवठा करणेसाठी महिला मंडळे म्हणजे महिला संस्था असुन सदर संस्थेचे सर्व संचालक/विश्वस्थ/सदस्य हे महिला असणे आवश्यक आहे तीची सार्वजनिक विश्वस्थ कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १८६० महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किवा कंपनी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली असावी.

वरील आदेशाप्रमाणे तालुक्यात एकुण ३९८ अंगणवाडयासाठी जिल्हा समिती स्थरावरुन महिला स्वयंसहाय्यता बचत गटांना मंजुरी प्राप्त झालेली आहे.

| बचत गट | मंजुर अनुदान | एकुण खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|
| बचत गट अंगणवाडी केंद्र | ४१,१५,००० | ४१,१४,५५१ | ४४९ |
| बचत गट नवे | ७,००,००० | ६,८९,७२५ | १०,२७५ |
| एकुण | ४८,१५,००० | ४८,०४,२७६ | १०,७२४ |

मार्च अखेर महिला स्वयंसहाय्यता बचत गटासाठी आहाराचा पुरवठा करुन दिल्याबाबत एकुण खर्च रुपये ४८,०४,२७६ एवढा बाल विकास प्रकल्प यांचे स्थरावर करणेत आलेला आहे. तसेच दिनांक २७.०९.०७ पासून कोषागारातुन देयके पारीत होत आहेत. या संदर्भात खालील त्रुटी नमुद करणेत येत आहेत.

१. उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक ७ नुसार सदरचे बचत गट हे सार्वजनिक विश्वस्थ कायदा १९५० संस्था नोंदणी अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेबाबत आवश्यक ते दस्तऐवज परीक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

२. बचत गटाची देयके या महिन्यानंतर पुढील महिन्याच्या जास्तीत जास्त १० तारखेपर्यंत बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी देयके अदा करावीत या संदर्भात अट ९.३ नुसार या योजनेअंतर्गत पुरक पोषण आहाराच्या खर्चासाठी शासनाकडून निधी वितरणास अपवादात्मक परिस्थितीत काही कारणामुळे विलंब झाल्यास जिल्हा परिषदेने जिल्हा निधीतून आगाऊ रक्कम खर्च करण्यांत यावी आणि महिला बचत गट / महिला मंडळे यांनी केलेल्या आहार पुरवठयाची

देयके अदा करावी असे नमुद असतांनाही संबंधित बचत गटांना १० तारखेच्या आत रक्कम प्रदान करणेत आलेली नाही असे अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे अर्थसहाय्य प्रदान करणेत आलेले आहे. वरील अटींचे जिल्हा परिषद व पंचायत स्तरावर पालन करणेत आलेले नाही.

३. शासन निर्णयातील अट क्रमाक ६.४ नुसार बचत गटातील सर्व सदस्य महिला असणे आवश्यक आहे असे नमुद असतांना बचत गटाचे सर्व सदस्य महिला असल्याचे साधार प्रमाणित करावे.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणात दर्शवावे. तोपर्यंत सदरचा खर्च रक्कम रुपये ४८,०४,२७६/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष
२२३६ पोषण आहार अन्य पेये यांचे वितरण
१०१ विशेष आहार
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ४८,०४,२७६/-
पंचायत समिती बागलाण

---

## परिच्छेद क्रमांक ६ :- महिलांच्या स्वयंसहायता बचत गटामार्फत अंगणवाडयातील लाभार्थ्यांना पुरक पोषण आहार पुरवठा करणेबाबत...

पंचायत समिती मालेगावमधील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत पुरक पोषण आहार पुरवठा कार्यपध्दतीत सुधारणा करणेबाबत महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक/एबाविसेयो/२००४/प्र.क्र./२३३/का-५/नविन प्रशासन भवन ३ रा मजला मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २८.१०.२००५ अन्वये शासन निर्णय करणेत आला आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना हि केंद्र पुरस्कृत योजना आहे. राज्यांमध्ये ग्रामीण आदिवासी आणि नागरी भागामध्ये राबविण्यात येते या योजनांतर्गत सहा वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता यांना पुरक पोषण आहार आरोग्य सकस आहार इत्यादी विविध सेवा देणे येतात.

या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचीका क्रमांक/१९६/२००१ मध्ये दिनांक ७ ऑक्टोबर २००४ आहाराचा पुरवठा ठेकेदारामार्फत करणेत येवु नये पुरक पोषण आहार पुरवठयाचे व आहार शिजविणेचे काम ग्रामसमुदाय/ स्वयंसहायता बचत गट आणि महिला मंडळे यांचेमार्फत करणेत यावेत असे आदेश दिलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णयत पोषण अहाराचा पुरवठा करणेसाठी योग्य स्वयंसहायता बचत गट महिला मंडळे यांची निवड करणेबाबात ग्रामविकस आणिक जलसंधारण विभागाचे दिनांक २५.५.२००५ ची शासन परिपत्रकानुसार दिलेल्या आदेशानुसार ग्रामसभा महिला ग्रामसभा यांच्या मदतीने करावी व त्यांचे ठराव घेऊन त्यानुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पातील अंगणवाड्यांसाठी बचत गट / महिला मंडळ यांची यादी तयार करुन जिल्हा समितीला सादर करावी व जिल्ह समितीने यादी अंतिम करावी.

वरील आदेशाप्रमाणे मालेगाव तालुक्यात एकुण ३३३ अंगणवाडयासाठी जिल्हा स्तरावरुन एकूण २१२ महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सन २००७ – २००८ मध्ये खालीलप्रमाणे खर्च करणे आलेला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | २१ | १७.०८.२००७ | १,४०,०३८ |
| २ | २२ | १७.०८.२००७ | १,७४,८०८ |
| ३ | २३ | १७.०८.२००७ | २,०५,२३६ |
| ४ | २४ | १७.०८.२००७ | १,७९,०२८ |
| ५ | २५ | १७.०८.२००७ | १,२७,७०७ |
| ६ | २६ | १७.०८.२००७ | १,००,८०० |
| ७ | २७ | १७.०८.२००७ | १,४७,८०३ |
| ८ | २८ | १७.०८.२००७ | ६४,१५४ |
| ९ | २९ | १७.०८.२००७ | १,९७,६७० |
| १० | ३० | १७.०८.२००७ | १,८३,४४६ |
| ११ | ३१ | १७.०८.२००७ | १,९८,३९१ |
| १२ | ३२ | १७.०८.२००७ | २,१७,६३९ |
| १३ | ३३ | १७.०८.२००७ | २,६६,६१३ |
| १४ | ३४ | १७.०८.२००७ | १,६७,०१० |
| १५ | ३५ | १७.०८.२००७ | १,८३,०६३ |
| १६ | ३६ | १७.०८.२००७ | ८८,६१८ |
| १७ | २८ | २६.१०.२००७ | २,६०,१६० |
| १८ | २९ | २६.१०.२००७ | १,७५,७७७ |
| १९ | ३० | २६.१०.२००७ | २,१३,९३६ |
| २० | ३१ | २६.१०.२००७ | २,०३,११७ |
| २१ | ३२ | २६.१०.२००७ | २,०६,८३९ |
| २२ | ३३ | २६.१०.२००७ | २,०४,०९६ |
| २३ | ३४ | २६.१०.२००७ | २,४२,६९८ |
| २४ | ३५ | २६.१०.२००७ | १,४५,३१४ |
| २५ | ३६ | २६.१०.२००७ | २,०८,०३८ |
| २६ | ३७ | २६.१०.२००७ | २,०७,९३७ |
| २७ | ३८ | २६.१०.२००७ | २,२९,९१३ |
| २८ | ३९ | २६.१०.२००७ | २,५८,२२९ |
| २९ | ४० | २६.१०.२००७ | १,७३,७३९ |
| ३० | ४१ | २६.१०.२००७ | १,५९,५७३ |
| ३१ | ४२ | २६.१०.२००७ | २,४९,६५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ४३ | २६.१०.२००७ | १,३०,९०५ |
| ३३ | १३७ | ३०.०१.२००८ | ६,०८८ |
| ३४ | १३८ | ३०.०१.२००८ | १८,५३७ |
| | | | ५९,३६,५७१ |

मार्च अखेर महिला स्वयंसहाय्यता बचत गटासाठी आहाराचा पुरवठा करुन दिल्याबाबत एकुण खर्च रुपये ५९,३६,५७१/- एवढा बाल विकास प्रकल्प यांचे स्तरावर करणेत आलेला आहे.

या संदर्भात खालील त्रुटी नमुद करणेत येत आहेत.

१. उपरोक्त शासन निर्णयातील अट क्रमांक ७ नुसार सदरचे बचत गट हे सार्वजनिक विश्वस्थ कायदा १९५० संस्था अधिनियम १८६० महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० किंवा कंपनी अधिनियम १६५६ यापैकी कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणी झालेबाबत आवश्यक ते दस्तऐवज परीक्षणात उपलब्ध झालेले नाहीत.

२. अट क्र. ९१ नुसर आहार पुरवठ्यांची देयके आहार पुरवठा झालेल्या महिन्यानंतर पुढील महिन्यांच्या जास्तीत जास्त १० तारखेपर्यंत बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी देयके आदा करावीत व संदर्भ अट ९३ नुसार या योजनेतंर्गत पुरक पोषण आहाराच्या खर्चासाठी शासनाकडून निधी वितरणांस अपवादात्मक परिस्थितीत काही कारणांमुळे विलंब झाल्यास जिल्हा परिषदेने जिल्हा निधीतून आगाऊ रक्कम खर्च करणेत यावी आण महिला बचत गट / महिला मंडळे यांनी केलेल्या आहार पुरवठ्यांची देयके अदा करावी असे नमुद असतांनाही संबंधित बचत गटांना १० तारखेच्या आत रक्कम प्रदान करणेत आलेली नाही जसे अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे अर्थ सहाय्य प्रदान करण्त आले आहे. वरील अटींचे जिल्हा परिषद व पंचायत स्तरांवर पालन करणेत आलेले नाही.

३. अट क्रमांक १० नुसार अंगणवाडीमध्ये आहार पुरवठा केल्यानंतर या आहाराच्या नमुन्यांची स्थानिक प्रयोगशाळेतून वर्षातून दोन वेळा अचानक तपासणी करणेत यावी, परंतु अशी तपासणी करण्यात आलेली नाही. याबाबत सदरच्या अटींचे पालन न करणेबाबत सक्षम अधिका-यांचे क्षमापन घ्यावे.

४. बचत गटांना जिल्हा स्तरावरुन नेमणूका दिलयनतर नेमणुकीचे आदेश बचत गट संख्या व त्यांतील अंगणवाडीची नावे नोंद करणे आवश्यक आहे. सदर नोंदवही ठेवून सर्व आदेश व अंगणवाडीची नावे नमुद करुन पुर्तता दर्शवावी.

५. जिल्हा स्तरावरुन प्राप्त आदेश व प्रत्यक्षांत बचत गटांनी आहार वाटपांस सुरुवात केव्हा केली याबाबत मुख्य सेविका व कार्यकर्ता यांनी अहवाल बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडे सादर केलेले नाहीत.

६. बचत गटांचे रुपये १००/- च्या स्टॅम्पवर करारनामा अटी व शर्ती नमुद केल्या आहेत. परंतु बालविकास प्रकल्प अधिकारी व मुख्य सेविका यांनी स्वाक्षरी केलेली नाही. करारनाम्यावर स्वाक्षरी घेऊन पुर्तता दर्शवावी.

७. बचत गट / मंडळे कार्यान्वित होणेपूर्वी प्रत्येक अंगणवाडीत असलेल्या शासनाच्या शिल्लक धान्य पुरवठा किती होता व तो महिला बचत गटांना केव्हा दिला अथवा ज्या

अंगणवाडीत शिल्लक होता त्या अंगणवाड्यांनी इतर अंगणवाड्यांना दिला किंवा कसे दिला असल्यास बचत गटांकडून त्या आहाराच्या किंमतीची वसूलीची कार्यवाही झाली किंवा नाही व कसे याबबत माहिती प्राप्त झाली नाही. एकूण ३०० अंगण्वाड्यांना शिल्लक साठा किती होता व त्यांची होणारी रक्कम ही संबंधित बचत गटाच्या देयकातून कपात केल्याची खात्री लेखापरीक्षणास करुन द्यावी. सदरचा शिल्लक साठा व साहित्य बचत गटांस दिले नसल्यांस अथवा माल देऊनही बचत गटांकडून कपात केली नसल्यांस त्वरीत पुढील प्रदानातून वसूल करणेत यावी.

८. शासन निर्णयतील अट क्रमांक ६.४ नुसार बचत गटांतील सर्व सदस्य महिला असणे आवश्यक आहे असे नमुद असतांना बचत गटांचे सर्व सदस्य महिला असलयाचे साधार प्रमाणित करावे.

९. बचत गटांकडून प्राप्त झालेली देयकांची नोंदवही दप्तरी ठेवलेली नाही. त्यामुळे बचत गटांना दुबार बिल अदा होणेची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी देयके तपासणी करुन स्वाक्षरी केलेली नाही. तरी वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी देयके तपासणी करुन स्वाक्षरी केलेली नाही. तरी वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी देयके बिल नोंदवहीत नोंदवून व तपासणी करुन स्वाक्षरी शिवाय गटविकास अधिकारी यांचेकडे सादर करुन नये याबाबत दक्षता घ्यावी.

१०. देयके सादर करण्यापूर्वी मुख्य सेविका यांनी बचत गटांने सादर केलेली बिले ही कार्यकर्तीच्या नोंदवही (नमुना तक्ता नंबर १) खात्री करुन व पडताळणी घेतली जात नाही. त्यामुळे बचत गटांने सादर केलेली देयके अचूक असल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही. योग्य ती पुर्तता दर्शवावी.

उपरोक्त अभिप्रायांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणात दर्शवावे. तोपर्यंत सदरचा खर्च रक्कम रुपये ५९,३६,५७१/- तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

लेखाशिर्ष<br>
२२३६ पोषण आहार अन्य पेये यांचे वितरण<br>
१०१ विशेष आहार<br>
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ५९,३६,५७१/-<br>
पंचायत समिती बागलाण

(पहा विवरणपत्र क्रमांक ४ ब चा अ.क्र. ‘ ४ ’)

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ ( ब ) खालील अनियमितता.

(कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले नुकसान.)

---

**परिच्छेद क्रमांक ७ :- बॉश पंप दुरुस्तीबाबत.**

एकात्मिक बाल विकास योजनेचे वाहन क्रमांक एम.एच. १५ के ६०८१ चे बॉश पंप दुरुस्तीचा खर्च सन २००७ – २००८ इतिवृत्त नोंदवहीत नोंदविला असून प्रमाणक क्रमांक २५ दिनांक ७.१०.२००८ रक्कम रुपये ६,०५५/- अन्वये खर्च अदा केलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१. जय डिझेल सर्विस, नाशिक यांचे बील क्रमांक ५७ / ५.३.२००८ अन्वये रक्कम रुपये ६,०५५/- मायको पिझोड पंप दुरुस्तीबाबत अदा केलेले आहेत.

२. मायको पिझोड पंपाची दुरुस्ती मायको अधिकृत विक्रेते यांचेकडून करणे आवश्यक असतांना खाजगी विक्रेते यांचेकडून केली आहे.

३. मायकोच्या अधिकृत पंपाचा सर्व्हीस किट क्रमांक ९ ४६१ ०३७ ००२ ची कमाल किरकोळ किंमत रुपये २००/- असतांना बिलात रक्कम रुपये ४८०/- नमुद असून अदा केली आहे. जादा रक्कम रुपये २८०/- संबंधित विक्रेत्यांकडून वसूल करण्यांत यावी.

४. पिझोड मायको पंपाचा रोटर क्रमांक १ ४६८ ३३४ ३२६ ची कमाल किरकोळ किंमत (एम. आर. पी.) रुपये ६,४८८/- आहे. सदर पंपाचा रोटर दुरुस्ती होत नसून त्या पंपाची सर्व्हिसींग मजूरी रक्कम रुपये ५००/- असतांना जादा रक्कम रुपये ३,५००/- संबंधितांस जादा अदा केलेली आहे. तरी सदरची रक्कम विक्रेत्यांकडून वसूल करुन लेखापरीक्षणांसस पुर्तता दर्शवावी.

लेखाशिर्ष
२२३६ पोषण आहार,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
वसूलपात्र रक्कम रुपये ३,७८०/-

---

**परिच्छेद क्रमांक ८ :- उपचार शास्त्रंभूत आहार पुरवठयातील जादा रक्कम प्रदानाबाबत.**

अ) प्रमाणक क्रमांक ९८ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रुपये ३,६४,३७३/- माहे डिसेंबर / जानेवारी २००७ करिता मालेगाव प्रकल्पातील परिच्छेद क्रमांक ३ वडनेर गटातील अंगणवाडी चलन क्रमांक १४१९५ ते १४२००, २०१ ते ३१३ अन्वये ९९० किलो थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे प्रत्यक्षात ९८० किलोचा पुरवठा केला आहे. त्यामुळे १० किलो साठी दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये २०६/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

ब) प्रमाणक क्रमांक ४३७ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रुपये ८४,११०/- माहे जानेवारी - फेब्रुवारी २००८ करिता देवळा प्रकल्पातील जुन्या नियमित अंगणवाडी केंद्रांना ४०८३ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा करणेसाठी प्रदान करणेत आलेली आहे. कोळदर अंगणवाडी चलन क्रमांक २०२३० अन्वये १४ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा व प्रत्यक्ष वापर केलेला आहे. तथापि देयक तयार करतांना त्यात २९ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे त्यामुळे १५

किलोसाठी दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये ३०९/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रुपये ३०९/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

क) प्रमाणक क्रमांक ४३८ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रुपये १,११,७३४/- माहे डिसेंबर – जानेवारी करिता सटाणा प्रकल्पातील जुन्या नियमित अंगणवाडी केंद्रांना ५४२४ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा करणेसाठी प्रदान करणेत आलेली आहे. सटाणा गटातील सागपाडा, दोधेश्वर या अंगणवाडी चलन क्रमांक १९३८३, १९२८३ अन्वये १०, २४ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे. त्यामुळे १४ किलोसाठी दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये २८८/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रुपये २८८/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

ड) प्रमाणक क्रमांक २७१ दिनांक ३१.३.२००८ माहे डिसेंबर – जानेवारी करिता नांदगाव प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांना १३८३ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे. प्रत्यक्षात १३७३ प्रत्यक्ष पुरवठा व वापर झालेला आहे. त्यामुळे १० किलोसाठी दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये २०६/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रुपये २०६/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

इ) प्रमाणक क्रमांक ४४१ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रुपये ३,३८,९११/- माहे डिसेंबर – जानेवारी २००८ करिता निफाड प्रकल्पातील जून्या नियमित अंगणवाडी केंद्रांना ७५ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा करणेसाठी प्रदान करणेत आलेली आहे. १६४५२ अंगणवाडीला चलन क्रमांक १८२२५ अन्वये ४५ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा व प्रत्यक्ष वापर केलेला आहे. तथापि देयक तयार करतांना त्यात ७५ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे. त्यामुळे ३० किलोसाठी दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये २०६/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रुपये ६१८/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

फ) प्रमाणक क्रमांक ४८ दिनांक २४.९.२००७ रक्कम रुपये ३,६०,३७६/- माहे एप्रिल - मे २००७ करिता मालेगाव प्रकल्पातील जून्या नियमित अंगणवाडी केंद्रांना थेरेपेटीक फुड पुरवठा करण्यासाठी प्रदान करणेत आलेली आहे. चिंचगव्हाणे – २ या अंगणवाडीला चलन क्रमांक ८३७९ दिनांक १०.७.२००७ अन्वये ३० किलो थेरेपेटीक फुड पुरवठा व प्रत्यक्ष वापर केलेला आहे. तथापि देयक तयार करतांना त्यात ४० थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे. त्यामुळे १० किलोसाठी दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये २०६/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रुपये २०६/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

ग) प्रमाणक क्रमांक ४७ दिनांक २४.९.२००७ रक्कम रुपये ३,६१,७९८/- माहे मे – जून करिता मालेगाव प्रकल्पातील जून्या नियमित अंगणवाडी केंद्रांना १४५६३ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा करण्यासाठी प्रदान करणेत आलेली आहे. दुधे – १ या अंगणवाडीला चलन क्रमांक ६६४३ अन्वये ३६ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा व प्रत्यक्ष वापर केलेला आहे. तथापि देयक तयार करतांना त्यात ३६ किलो थेरेपेटीक फुड पुरवठा दर्शविला आहे. त्यामुळे ३६ किलोसाठी

दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये ७४२/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रुपये ७४२/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

लेखाशिर्ष
२२३६ पोषण आहार
एकात्मिक बाल विकास योजना
१०१ वि. पोषण आहार कार्यक्रम
अंतिम अमान्य रक्कम रुपये २,५७५/-

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- जादा किलोमीटर नमुद केल्याबाबत.**

एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे वाहन क्रमांक एम.एच. १५ के ६०८१ चे वाहन रोजनिशी तपासली असता खालीलप्रमाणे प्रत्यक्ष किमी, प्रवासाचे ठिकाण वाहन रोजनिशीच्या तपशिलात नमुद केल्यावरुन जादा किलोमीटर नमुद केले आहे. शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.०५ नुसार जादा आकारणी प्रवासास एकूण किमी ५४४ ची रु. ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रु. ४,३५२/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

| अ. क्र. | दिनांक | कोठून | कोठे | नमुद किमी | प्रत्यक्ष किमी | जादा किमी | तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०७.१२.२००७ | नाशिक | ना.रोड | ५० | २५ | २५ | ना.रोड व ग्रामसेवक भवन |
| २ | ०८.१२.२००७ | नाशिक | ना.रोड | ४५ | २५ | २० | आयुक्त कार्यालय |
| ३ | १५.१२.२००७ | नाशिक | कळवण ना.रोड | २२५ | १७५ | ५० | कळवण कर्मचारी मिटींग |
| ४ | २७.१२.२००७ | नाशिक | ना.रोड | ५० | २५ | २५ | नियोजन भवन, ना.रोड आयुक्त कार्यालय |
| ५ | २९.१२.२००७ | नाशिक | ना.रोड ताज हॉटेल | ७५ | ३० | ४५ | ना.रोड ताज हॉटेल |
| ६ | ११.०१.२००८ | नाशिक | निफाड येवला पं.स. | २३५ | १८० | ५५ | निफाड येवला पंचायत समिती |
| ७ | २५.०२.२००८ | नाशिक | ना.रोड | १२४ | २५ | ९९ | नियोजन भवन, आदिवासी विकास, ना.रोड |
| ८ | १९.०३.२००८ | नाशिक | कळवण | ४७५ | २५० | २२५ | कळवण गणेशनगर, वरवंडी (देवळा), मटाने (देवळा), गुंजाळनगर, वारुगाव खर्डा, प्राथमिक आरोग्य केंद्र, देवळा, कळवण |
| | | | | | **एकूण** | **५४४** | |

वसूलपात्र रक्कम रुपये ४,३५२/-
२२३६, पोषण आहार
एकात्मिक बाल विकास संवा योजना

**परिच्छेद क्रमांक १० :- उपचार शास्त्रंभूत आहार पुरवठयातील अनियमिततेबाबत.**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागामार्फत नाशिक जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांना सन २००७ – २००८ करीता थेरेपेटीक फुडचा पुरवठा करण्यात आलेला असून त्यानुसार रक्कमा प्रदान केलेल्या आहेत. तथापि देयक पडताळणी करतांना प्रत्यक्ष पुरवठाा चलन पावती साठा नोंदवही व चलन पावतीवर पोहोच स्वाक्षरी नसल्याबाबत खालीलप्रमाणे तफावत असल्याचे आढळून आले.

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | वीट व अंगणवाडी केंद्र | चलन क्र. | दिनांक | पुरवठा केलेला माल किग्रॅ. | प्र. क्र. | दिनांक | तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिन्नर | भाटवाडी | १५८०८ | २०.२.०८ | ४८ | १०९ | ३१.३.०८ | चलनावर पोच स्वाक्षरी नाही |
| २ | दिंडोरी | शिवनई | ९२१६ | | २६ | १३३ | १८.९.०७ | --//-- |
| | | मोलविहीर | २३२७ | | २४ | १३३ | १८.९.०७ | --//-- |
| ३ | मालेगाव | चट्टाणेपाडा – २ | १६४३६ | ११.११.०७ | २७ | ९४ | ३१.३.०८ | --//-- |
| | | भारदेनगर | १७०५० | ११.११.०७ | १८ | ९४ | ३१.३.०८ | --//-- |
| | | घाणेगाव | १७१५१ | ११.११.०७ | ५१ | ९४ | ३१.३.०८ | --//-- |
| | | काळाणे(गा) | १७१५१ | ११.११.०७ | ४२ | ९४ | ३१.३.०८ | --//-- |
| | | कळवाडा | १७१५४ | ११.११.०७ | ३७ | ९४ | ३१.३.०८ | --//-- |
| | | सायनरपाडा | १७१६७ | ११.११.०७ | १५ | ९४ | ३१.३.०८ | --//-- |
| | | येसगाव खु।। | १७१९८ | ११.११.०७ | ३० | | | --//-- |
| | | येसगाव खु।। | १७१९९ | ११.११.०७ | २० | | | --//-- |
| | | चंदनपुरी -४ | १७२१० | ११.११.०७ | २० | | | --//-- |
| | | संवदगाव | १७२१२ | ११.११.०७ | ४० | | | --//-- |
| | | परेलनगर | १७००९ | ११.११.०७ | २५ | | | --//-- |
| | | ज्वाडी खु।। | १७२१८ | ११.११.०७ | १० | | | --//-- |
| | | - | १७०११ | ११.११.०७ | २५ | | | --//-- |
| | | काळेवाडी-२ | १७३५५ | ११.११.०७ | ३७ | | | --//-- |
| | | रामनगर-१० | ७२८९ | | ५० | ४८ | २४.९.०७ | --//-- |
| ४ | देवळा | हनमतपाडा | २०६० | | ६२ | ४५३ | ३१.३.०८ | --//-- |
| ५ | चांदवड | वावी खु।। | २३३०४ | २५.३.०८ | ७२ | ४४० | ३१.३.०८ | --//-- |
| | | धीवरखेडे | २३३४२ | २५.३.०८ | २४ | ४४० | ३१.३.०८ | --//-- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शिवाजीनगर | २३४६९ | २५.३.०८ | ३४ | ४३२ | ३१.३.०८ | --//-- |
| | | मेमेनखेड | १५६३४ | १८.२.०८ | १४ | ९२ | ३१.३.०८ | --//-- |
| | | | | **एकूण** | **७५०** | | | |

उपरोक्त ७५० किलो थेरेपेटीक फुड कमी प्राप्त झाल्याबाबत चौकशी करुन प्रति किलो दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रुपये १५,४५०/- ची संबंधितांकडून वसूली करण्यात यावी.

लेखाशिर्ष
२२३६ स्थानिक पुरक आहार
योजनांतर्गत अनुदान
अंतिम अमान्य रक्कम रुपये १५,४५०/-

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- दुरध्वनी देयके उशिरा भरलेबाबत.**

खालीलप्रमाणे दुरध्वनी देयके उशिराने भरल्यामुळे त्यात विलंब आकार भरावा लागला आहे. सदरची विलंब आकाराची रक्कम रुपये १७०/- संबंधितांकडून वसूल करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

| प्र. क्र. | दिनांक | रक्कम रुपये | मुळ बील रक्कम रुपये | विलंब आकार | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| | ३१.३.२००८ | ७०२१ | ६,९५१ | १७० | दुरध्वनी क्र. २५०२८१५ फेब्रुवारी - मार्च २००८ |

लेखाशिर्ष
२२३६, पोषण आहार,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
वसुलपात्र रक्कम रुपये १७०/-

---

**परिच्छेद क्रमांक १२ :- उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्याची अंगणवाडीला दुबार प्रदानाबाबत**

खालील प्रमाणकाद्वारे मालेगाव प्रकल्पातील जून्या नियमित अंगणवाडी व नवीन अंगणवाडीची तपासणी केली असता दाभाडी गटातील चौफाटा – ३ अंगणवाडीला जून्या अंगणवाडी व नवीन अंगणवाडीच्या थेरेपेटीक फुड पुरवठा केल्याचा खर्च नमुद आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| ९४ | ३१.३.२००८ | २,३१,४६२ | दाभाडी चौफाटा – ३ चलन क्रमांक १३६८२ – ३० किलो माहे ऑगस्ट - सप्टेंबर २००७ |
| ११३ | ३१.३.२००८ | १,५०,५९१ | दाभाडी चौफाटा – ३ चलन क्रमांक १३६८५ – ३० किलो माहे ऑगस्ट - सप्टेंबर २००७ |
| ९८ | ३१.३.२००८ | ३,६४,३७३ | दाभाडी चौफाटा – ३ चलन क्रमांक १४१७२ – ३८ किलो माहे डिसेंबर २००७ – जानेवारी २००८ |
| ११६ | ३१.३.२००८ | २२,२२७ | दाभाडी चौफाटा – ३ चलन क्रमांक १४१६९ – ३८ किलो माहे डिसेंबर २००७ – जानेवारी २००८ |
| ४५१ | ३१.३.२००८ | ३,२७,९५२ | दाभाडी चौफाटा – ३ चलन क्रमांक निरंक – ३८ किलो माहे फेब्रुवारी - मार्च २००८ |
| १२९ | ३१.३.२००८ | १८,३७५ | दाभाडी चौफाटा – ३ चलन क्रमांक निरंक – ३३ किलो माहे फेब्रुवारी - मार्च २००८ |

उपरोक्त दुबार प्रदान झालेली १०१ किलो दर रुपये २०.६० प्रमाणे रक्कम रु. २,०८१/- चे जादा प्रदान झालेले आहे. तरी रक्कम रु. २,०८१/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी व शासन सदरी भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

लेखाशिर्ष
२२३६, एकात्मिक बाल विकास सेवा योजना
१०१ विशेष पोषण आहार
अमान्य रक्कम रुपये २,०८१/-

---

**परिच्छेद क्रमांक १३ :- उपचार शास्त्रंभुत पुरवठयातील जादा रक्कम प्रदानाबाबत**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, मालेगाव कडील फुड जमा साठा रजिस्टर व पावत्यांची तसेच प्रमाणकांची तपासणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

१. प्र.क्र.९८ दि. ३१.०३.२००८ रक्कम रुपये ३,६४,३७३/- नुसार टॉपलाईन फुड्स धुळे यांनी मालेगाव मधील प्रकल्पातील केंद्राना माहे डिसेंबर-०७ व जानेवारी २००८ करीता दर रक्कम रुपये २०.६० प्रमाणे १७६८८ किलो थेरॅटॅपडिफुडचा पुरवठा केलेला आहे.

२. एकात्मिक बालविकास योजना, मालेगाव कडील क्रमांक ए.बा.वि.यो./सा/४/०८ दि. ३१.०१.२००८ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला असून पं.स. मालेगाव क्रं. ए.बा.वि.से.यो./४५/३ शास्य /२९१२/दि. २९.२.२००८ अन्वये मालाचे प्रयोग शाळा चाचणी अहवालासाठी नमुना पाठविणेत आला. तो अहवाल दि. १३.०३.०८ रोजी प्राप्त झाला. सदर आहार हा डिसेंबर-०७ व जानेवारी २००८ साठी असतांना मागणी ३१ जानेवारी २००८

म्हणजेच जानेवारी संपल्यावर मागणी केलेली आहे व पुरवठा मात्र फेब्रुवारी ०८ मध्ये केलेला आहे. या विसंगतीबाबत स्पष्टीकरण व्हावे व माहे डिसेंबर ०७ व जाने ०८ मध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ दिलेबाबत साधार प्रमाणीत करावे.

३. करारनाम्यातील अट क्रं. १३ अन्वये १५ दिवसाच्याआत पुरवठा न केल्यास मालाच्या किमतीवर अर्धा टक्का प्रतिआठवडा, १३(अ) अन्वये १ लाखापेक्षा कमी किंमत असेल तर किंमतीच्या कमाल १०% व १३(ब) अन्वये १ लाखापेक्षा जास्त असेल तर कमाल ५% दंड आकारणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही केली नाही. खालीलप्रमाणे दंडाची रक्कम रुपये ७,८४७/- वसुल करुन शासन जमा करावी.

| अ. क्रं. | केंद्राचे नाव | पुरवठा किलो | दर | एकुण रक्कम | पुरवठा आदेश दि. | प्रत्यक्ष पुरवठा दि. | किती दिवस उशिरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | झोडगा | ९७१ | २०.६० | २०,००३ | ३१/१/०८ | २०/२/०८ | ६ |
| २ | कळवाडी | ८८० | २०.६० | १८,१२८ | ३१/१/०८ | १९/२/०८ | ७ |
| ३ | दहीवाळ | १७७४ | २०.६० | ३६,५४५ | ३१/१/०८ | १९/२/०८ | ५ |
| ४ | चंदनपुरी | १५४ | २०.६० | ३,१७२ | ३१/१/०८ | १५/२/०८ | १ |
| ५ | सोनज | ३० | २०.६० | ६१८ | ३१/१/०८ | १८/२/०८ | ४ |
| | | | | ७८,४६६ X १० % = ७,८४७ | | | |

४. चंदनपुरी गटातील अंगणवाडी मोरेवाडी नं.२ मध्ये प्रत्यक्ष माल पुरवठा केलेला नसतांनाही ४८ किलो पुरवठा दाखवुन रक्कम रुपये ९८९/- जादा प्रदान झाले आहे. रक्कम वसुल करुन अनुपालन दाखवावे.

उपरोक्त बाबींची पुर्तता करणेत यावी रक्कम रुपये ८८३६/- शासकिय अनुदानासाठी अंतिम अमान्य व पुर्तता होईपर्यंत रक्कम रुपये ३,५५,५३७/- तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

लेखाशिर्ष<br>२२३६, पोषण आहार<br>अभिकरण योजना<br>अंतिम अमान्य रक्कम रुपये ८,८३६/-<br>तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ३,५५,५३७/-

(विवरणपत्र क्रं. ४(अ) चा अ.क्रं. ७ पहा)
(विवरणपत्र क्रं. ४(ब) चा अ.क्रं. ५ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक १४ :- अतिरिक्त घरभाडे रक्कम जादा अदा केलेबाबत.**

पंचायत समिती इगतपुरी सन २००७ – २००८ मध्ये अभिकरण योजना निधी प्रमाणक क्रमांक ३८ दिनांक २८.३.२००८ ची पडताळणी केली असता एकात्मिक बालविकास

विभागाकडील येथील खालील दर्शविलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या वेतन देयकात अतिरिक्त घरभाडे रक्कम जादा अदा झालेली आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | नाव | पदनाम | मुळवेतन | दिलेली रक्कम | देय रक्कम | वसूलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती एफ. यु. नाइकवाडी | मुख्यसेविका | ४,५०० | ४६० | २९० | १७० |
| २ | श्रीमती एम. पी. शार्दुल | मुख्यसेविका | ४,५०० | ४६० | २९० | १७० |
| ३ | श्रीमती एम. एल. दराडे | मुख्यसेविका | ४,५०० | ४६० | २९० | १७० |
| ४ | श्रीमती जे. के. काळे | मुख्यसेविका | ४,५०० | ४६० | २९० | १७० |

उपरोक्त कर्मचा-यांना शासन निर्णय क्रमांक घभाव-२०००/प्र.क्र.९७/२००० /सेवा-५/दिनांक १७.२.२००१ अन्वये नमुद दरापेक्षा जादा अदा झालेली रक्कम सेवेच्या रुजू दिनांकापासून परिगणित करुन संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. सदरची रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे त्यांचे सेवपुस्तकांमध्ये नोंदी घेऊन अनुपालन लेखापरीक्षणस सादर करावे.

लेखाशिर्ष
पोषण आहार योजना
४ बी केंद्र पुरस्कृत योजना
आस्थापना अनुदान
पंचायत समिती इगतपुरी

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे वेतनवाढी अदा केल्याबाबत.....**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परिक्षा नियम १९८५ मधील नियम ५(१)(ब) व शासन निर्णय क्र.डी.एस.बी./१०८५/सी.आर/२२१/१३ दिनांक २०.१.१९८६ नुसार सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू करण्यात आलेली आहे. सदर परीक्षा कोणत्या पदासाठी लागू आहे, याबाबत शासन आदेश क्र. डी.एस.बी./१०८५/सीआर/२२१/१३/ दिनांक २०.१.१९८६ चे नियम ६ (१) मधील तरतुदी व सेवा प्रवेशोत्तर नियमावली १९८५ चे कलम ५ मध्ये नमुद केलेप्रमाणे परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अथवा त्यापासून सूट मिळेपर्यंत धारण करीत असलेल्या पदाच्या वेतनश्रेणीत पुढील वेतनवाढी देय नाहीत.

उपरोक्त नमुद शासन आदेशानुसार ज्या पदास सेवा प्रवेशोत्तर परीक्षा लागु केलेली आहे, अशा पदांवर नियुक्ती झालेल्या दिनांकापासून चार वर्षाचे कालावधीत तीन संधीत परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची चौथी नियमित वेतनवाढ परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अथवा उत्तीर्ण होणेपासून सूट मिळण्याचे दिनांकापर्यंत रोखून धरणे आवश्यक आहे. सदर परिक्षा सन १९८९ पासून सुरु करण्यांत आलेल्या आहेत.

तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एपीटी/३६९६/ सीआर – १४१/१३ दिनांक २३ जुलै १९९६ अन्वये सेवाप्रवेशोत्तर परीक्षा पास न झालेल्या कर्मचा-यांना पदोन्नती / आगाऊ वेतनवाढी देण्यात येऊ नये, असे आदेशित आहे.

असे असतांनाही श्रीमती वत्सला रावजी गवळी, पर्यवेक्षिका, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, हरसूल यांना सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झाले नसतांना शासन आदेशानुार कार्यवाही न करता खालीलप्रमाणे नियमबाह्यपणे नियमित वेतनवाढी दिल्याने त्या कम्रचा-यांना वेतन व भत्त्याचे जादा प्रदान झालेले आहे. परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे जादा प्रदान रक्कम रुपये ६५,८९८/- परिगणित करुन एकरकमी वसूल केल्याचे व त्यांच्या सेवा पुस्तकात सुधारीत वेतननिश्चितीसह योग्य ती तपशीलवार नोंद घेतल्याचे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन |
|---|---|---|---|
| १ | ०१.०८.२००२ | ५,००० | ४,८७५ |
| २ | ०१.०८.२००३ | ५,१२५ | ४,८७५ |
| ३ | ०१.०८.२००४ | ५,२५० | ४,८७५ |
| ४ | ०१.०८.२००५ | ५,३७५ | ४,८७५ |
| ५ | ०१.०८.२००६ | ५,५०० | ४,८७५ |
| ६ | ०१.०८.२००७ | ५,५०० | ४,८७५ |
| ७ | ०१.०८.२००८ | ५,५०० | ४,८७५ |

लेखाशिर्ष
२२३६ एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
वेतन व भत्ते,
अंतिम अमान्य रक्कम रुपये ६५,८९८/-
पंचायत समिती त्र्यंबक (हरसुल)

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- अतिरिक्त घरभाडे भत्ता जादा अदा केलेबाबत.**

पंचायत समिती सुरगाणा सन २००७ – २००८ मध्ये अभिकरण योजनेचे प्रमाणक क्रमांक १७३ दिनांक ३१.३.२००८ ची पडताळणी केली असता एकात्मिक बालविकास विभागाकडील येथील खालील दर्शविलेल्या कर्मचा-यांना दिनांक १.११.२००६ ते ३०.६.२००७ (एकूण ८ महिने) या कालावधीतील अतिरिक्त घरभाडे भत्ता फरक देयकात जादा रक्कम अदा झालेली आहे.

(आकडे रुपयांत)

| अ. क्र. | नाव | पदनाम | मुळवेतन | दिलेली रक्कम | देय रक्कम | वसूलपात्र रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती पी. एल. चव्हाण | मुख्यसेविका | ४,७५० | ४६० | १३० | १७० |
| २ | श्रीमती के. के. धुम | मुख्यसेविका | ४,८७५ | ४६० | २९० | १७० |

उपरोक्त कर्मचा-यांना शासन निर्णय क्रमांक घभाव-२०००/प्र.क्र.९७/२००० /सेवा-५/दिनांक १७.२.२००१ अन्वये नमुद दरापेक्षा जादा अदा झालेली रक्कम (रुपये १७० × ८ महिने = १,३६० प्रति कर्मचारी × २ कर्मचारी = २,७२०/-) रुपये २,७२०/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी. सदरची रक्कम योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे त्यांचे सेवपुस्तकांमध्ये नोंद घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

लेखाशिर्ष
२२३६, पोषण आहार योजना
२ अन्न व पेय वितरण,
वसूलपात्र रक्कम रुपये २,७२०/-
पंचायत समिती सुरगाणा

**परिच्छेद क्रमांक १७ :- पोषण आहार पुरवठा करणा-या बचत गटांना झालेल्या दुबार प्रदानाबाबत.**

पंचायत समिती, सुरगणाकडील प्रथम देयक प्रमाणक क्रमांक १७ दिनांक १४.९.२००७ अन्वये रक्कम रुपये ६,२७,८८९ पोषण आहार पुरवठा करणा-या बचत गटांना माहे फेब्रुवारी २००७ ते एप्रिल २००७ या कालावधीसाठी अदा केलेले आहे. सदर देयकामध्ये मनखेड बीटामधील महालक्ष्मी महिला बचतगट, म्हैसमाळ यांचे रक्कम रुपये ५,६११/- इतके माहे एप्रिल २००७ चे देयक अंतर्भुत आहे.

द्वितीय देयक प्रमाणक क्रमांक ७६ दिनांक ३१.३.२००८ रक्कम रुपये ५,०४,७७५ इतकी पोषण आहार पुरवठा करणा-या बचतगटांना माहे एप्रिल २००७ ते जुन २००७ या कालावधीचे देयक अदा केलेले आहे. सदर देयकामध्येही मनखेड बीटामधील महालक्ष्मी महिला बचतगट, म्हैसमाळ यांचे माहे एप्रिल २००७ चे बील समाविष्ट केल्याने रक्कम रुपये ५,६११/- संबंधीतांना जादा प्रदान झालेले आहे.

सदरची रक्कम संबंधीतांकडून वसुल करावी व ती योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

लेखशिर्ष
२२३६ पोषण आहार,
०२ पोषण अन्न व पेय वितरण
वसुलपात्र रक्कम रुपये ५,६११/-
पंचायत समिती, सुरगाणा.

**परिच्छेद क्रमांक १८ :- प्रवासभत्ता देयकातील अनियमित प्रदानाबाबत.**

पंचायत समिती पेठ, अधिनिस्त एकात्मिक बालविकास विभागाकडील किरकोळ रोकडवहीची पडताळणी केली असता, प्रमाणक क्रमांक ३८ दिनांक १७.३.२००८ नुसार रक्कम रु. ७,४८३/- श्री. एस. बी. परदेशी, वरिष्ठ सहाय्यक यांना दि. २१.३.०७ ते ७.१२.२००७ या कालावधीतील प्रवासभत्ता बिलापोटी अदा केलेली आहे.

सदर प्रवासभत्ता देयकाची हजेरी नोंदवहीशी पडताळणी केली असता, खालील नमुद तारखांना श्री. परदेशी यांच्या हजेरी पत्रकावर स्वाक्ष-या असून प्रवासभत्ता देसकात संबंधीतांनी त्याच तारखांना प्रवास केल्याचे व सकाळी १०.०० च्या अगोदरची वेळ प्रवासास निघण्याची नमुद केलेली असल्याने सदरचा खर्च लेखापरीक्षणास मान्य नाही.

| कालावधी | दिवस | प्रवासाचे ठिकाण | जादा प्रदान रक्कम |
|---|---|---|---|
| २३.३.२००७ ते २४.३.२००७ | २ | पेठ ते नाशिक | २५६ |
| २.४.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| १८.७.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| ३०.७.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| ८.८.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| १४.८.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| २९.८.२००७ ते ३०.८.२००७ | | ---//--- | २५६ |
| ८.९.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| १०.९.२००७ ते ११.९.२००७ | २ | ---//--- | २५६ |
| १२.९.२००७ | १ | ---//--- | १६६ |
| ५.११.२००७ ते ६.११.२००७ | २ | ---//--- | २५६ |
| ३.१२.२००७ ते ४.१२.२००७ | २ | पेठ ते मुंबई | ५०४ |
| ७.१२.२००७ | १ | पेठ ते नाशिक | १६६ |
| | | एकूण | २,८५६ |

वरीलप्रमाणे रक्कम रुपये २,८५६/- संबंधीतांकडून उचित प्रशासकीय कारवाईसह वसुल करून योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करावी व तशी नोंद त्यांचे सेवापुस्तकात घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

लेखाशिर्ष
२२३६,एबावियो
पंचायत समिती पेठ
वसुलपात्र रक्कम रुपये २,८५६/-

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- नियमबाह्य खर्चाबाबत.**

पंचायत समिती पेठ कडील प्रमाणक क्रमांक २४२ दिनांक ३१.३.२००८ अन्वये खालील उपप्रमाणकांन्वये रुपये ७,५००/- रेणुका कॉम्प्युटर्स, मेरी, नाशिक यांना प्रदान करण्याचा खर्च नोंदविला आहे.

| उपप्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ४० | ०४.०६.२००७ | ८५० |
| ४३ | ०९.०६.२००७ | ७७५ |
| ६५ | २८.०७.२००७ | ९६५ |
| ५२ | २५.०६.२००७ | ४२५ |
| ७० | ०३.०८.२००७ | ५२० |
| ८२ | २६.१०.२००७ | ९७५ |
| ८६ | २७.१०.२००७ | ६७५ |
| ११२ | २३.०१.२००८ | ६६५ |
| ११० | २१.०१.२००८ | ९८५ |
| १२६ | २६.०२.२००८ | ६६५ |
| | **एकूण** | **७,५००** |

उपरोक्त नमुद खर्च एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयातील अंगणवाडी सेविका / मदतनीस मानधन देयके, कर्मचारी वृंद वेतन देयके, बँक याद्या इत्यादी संगणक कामकाजासाठी नोंदविला आहे. मात्र हे नियमित कार्यालयीन कामकाज असल्याने त्यापोटी सादील खर्च नियमबाह्य आहे. त्यामुळे रुपये ७,५००/- जबाबदारी निश्चित करुन वसूल करण्यात यावी व योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करण्यात यावी.

तसेच वित्त शाखा, पंचायत समिती यांनी उपरोक्त कामासाठी लेखापरीक्षण कालावधीत व यापूर्वीही जे प्रदान केले आहे, त्याची संपूर्ण परिगणना करुन रक्कम वसूल करण्यात यावी.

लेखाशिर्ष
२२३६ पोषण आहार,
०२ पोषण आहार अन्न व पेये वितरण
१०१ विशेष पोषण आहार कार्यक्रम
(०४)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अनुदान
(बी) केंद्र पुरस्कृत योजना
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
पंचायत समिती पेठ
अंतिम अमान्य रक्कम रुपये ७,५००/-

---

## चे कलम ९ (क) खालील अनियमितता.

(एखादया व्यक्तीस तिला मिळालेली रक्कम लेख्यामध्ये दाखवीणे आवश्यक होते परंतु जी अशी दाखविण्यात आली नाही अशी रक्कम.)

**निरंक**

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील अनियमितता.

(अ,ब,क,व्यतिरिक्त लेख्यामध्ये आढळुन आलेल्या इतर अनियमितता.)

---

### परिच्छेद क्रमांक २० :- लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध न करणेबाबत व संशयीत अपहाराबाबत.

एकात्मिक बाल विकास विभाग जि.प. नाशिकचे सन २००७-०८ चे लेखापरिक्षणात खालीलप्रमाणे अर्धसमासपत्र देऊन माहिती/ लेखे मागणी केलेली होती. परंतू सदरची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही.

<table>
<tr><th>अ. क्रं.</th><th>अर्धसमास पत्र क्रमांक व दिनांक</th><th colspan="5">तपशिल</th></tr>
<tr><td rowspan="5">१)</td><td rowspan="5">१/१२.१.०९</td><td colspan="5">अ)प्रत्येक तालुक्यातील अंगणवाडयांसाठी थेरॅपेटीक फुडचे पुरवठा आदेश क्रं व दिनांक व मागणी पॅकेट्स संख्या. थेरॅपेटीक फुडचा प्रत्यक्ष झालेला पुरवठा दिनांक व कोणत्या महिन्यासाठी पुरवठा केला आहे याबाबतची माहिती तसेच थेरॅपेटीक फुडचे प्रयोगशाळेतील चाचणी अहवाल इ. माहिती पडताळणीस उपलब्ध करण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती.</td></tr>
<tr><td colspan="5">ब) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) यांची दैनंदिनी, लॉगबुक व प्रवासभत्ते देयके .</td></tr>
<tr><td colspan="5">क) मा. आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना नवी मुंबई यांचे मार्फत सन २००६-०७ मध्ये अंगणवाडयांना पुरवठा केलेल्या फोल्डींग काथ्याच्या गादयांची माहिती.</td></tr>
<tr><th>अ. क्र.</th><th>तालुक्याचे नाव</th><th>अंगणवाडी केंद्राचे नाव</th><th>विद्यार्थी संख्या</th><th>पुरवठा केलेल्या फोल्डींग गाद्या</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>२)</td><td>२/१६.१.०९</td><td colspan="5">वरील माहिती देण्यासाठी स्मरणपत्र -१ देण्यात आले.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ३) | ३/२१.१.०९ | वरील माहिती देण्यासाठी स्मरणपत्र -२ देण्यात आले. |

१) एकात्मिक बाल विकास विभागाचे सन २००७-०८ चे लेखापरीक्षण अहवालाचे अंतिमिकरण करणेकामी वरीलप्रमाणे अर्धसमासपत्र व स्मरणपत्र देवूनही दि. २२.१.२००९ अखेरपोवतो माहिती /लेखे उपलब्ध करण्यात आलेले नव्हते. दि. २३.१.२००९ रोजी दैनंदिन्या व लॉगबुक पडताळणीस उपलब्ध केले मात्र प्रवासभत्ते देयके पडताळणीस उपलब्ध केलेली नाहीत. दैनंदिन्या, लॉगबुकची व इतिवृत्त नोंदवहीची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) हया महिला व बालकल्याण सभेस हजर असल्याबाबतची स्वाक्षरी इतिवृत्त नोंदवहीत आहे. व त्याच दिवशी दौ-यावरही असल्याबाबतच्या नोंदी लॉगबुकमध्ये आहेत. मार्च २००८ ची मासिक दैनंदिनी लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही.

| अ. क्र | दिनांक | महिला व बालकल्याण सभेस हजर ठिकाण | लॉगबुकनुसार दौरा ठिकाण |
|---|---|---|---|
| १) | २६.६.२००७ | नाशिक | जातेगाव, मुळेगाव, दहेगाव |
| २) | २४.८.२००७ | नाशिक | नाशिकरोड येथे बैठकीस हजर |
| ३) | २४.९.२००७ | नाशिक | महिरावणी, गौळाणे |
| ४) | ४.१०.२००७ | नाशिक | ईगतपुरी, मुंढेगाव |
| ५) | ६.११.२००७ | नाशिक | आशेवाडी, गवळीवाडी, खंबाळे, उमराळे |

वरील तपशिलानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) हयांनी एकाच दिवशी मबाक समितीच्या सभेस व कार्यालयीन दौरे केल्याचे दिसून येते. अधिक पडताळणीसाठी प्रवासभत्ते देयके मागणी केली असता प्रवासभत्ता देयके या कार्यालयाकडे नाहीत असे तोंडी उत्तर देवून लेखापरिक्षणास असहकार्य केले आहे.

२) थेरॅपॅटीक फुडच्याबाबत अर्धसमासपत्रान्वये माहिती मागणी केली असता अर्धवट लेखे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तालुक्यातील अंगणवाडयांचे पुरवठा आदेश क्रमांक व दिनांक व थेरॅपॅटीक फुडचा प्रत्यक्ष पुरवठा केव्हा झाला, पुरवठा झालेले थेरॅपॅटीक फुड कोणत्या महिन्यासाठी पुरवठा करण्यात आलेला आहे, पुरवठा करण्यात आलेल्याच थेरॅपॅटीक फुडचे प्रयोगशाळेचे चाचणी अहवाल घेण्यात आलेले आहेत किवा कसे इत्यादी बाबतची परीपूर्ण माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे मुदतबाहय थेरॅपॅटीक फुडचा पुरवठा झाला किवा कसे तसेच आदिवासी भागातील कुपोषित बालकांना वर्षातील ३०० दिवस सकस आहाराचा पुरवठा झालेला आहे किवा नाही व शासनाच्या योजनांचा संबंधित लाभार्थ्यांस लाभ झाल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही. याबाबत अंतर्गत लेखापरिक्षण विभाग अथवा स्वतंत्रपणे सखोल तपासणी व्हावी.

३) सन २००७ – २००८ मध्ये फोल्डींग काथ्याच्या गादयाच्या खरेदीवर मबाक विभागाने रुपये ७१,००,२८३/- खर्च केलेला आहे.

सन २००६-०७ मध्ये शासन स्तरावरुन फोल्डींग काथ्याच्या गादयांचा पुरवठा प्रत्येक आदिवासी तालुक्यातील अंगणवाडयांना केलेला आहे असे महाराष्ट्र शासन आदिवासी

विकास विभाग, शासन निर्णय क्रं मबावि-२००६/प्र.क्रं.११९/का.८ दि.३०.६.०६ अन्वये समजून येते.

मार्च २००८ अखेर अनुदान उपलब्ध नसतांना व मागणी नसतांना इतर लेखाशिर्षाखालील अनुदान वर्ग करुन वित्त विभागाच्या सहमतीशिवाय खरेदी केलेली आहे. याबाबत प्रस्तुत अहवालात स्वतंत्र आक्षेप नोंदविण्यात आला आहे.

४) फेब्रुवारी व मार्च २००८ थेरॅपॅटीक फुडसाठी पुरवठा आदेश मार्च २००८ मध्ये दिलेला आहे. थेरॅपॅटीक फुडचा प्रयोगशाळा चाचणी अहवाल तपासणीसाठी १६ प्रकल्पांनी दिनांक २५.३.२००८ रोजी नमुने पाठविली आहे व त्याचा अहवालही दिनांक ३१.३.२००८ रोजी प्राप्त झालेला आहे. तसेच देयकेही दि. ३१.३.२००८ रोजी पारीत करणेत आली परंतु प्रत्यक्षात थेरॅपॅटीक फुडचा पुरवठा एप्रिल २००८ मध्ये झालेला असतांना प्रकल्पांनी नमुने कोणते पाठविले व पुरवठा झालेलाच नसतांना वित्त विभागाने देयके कसे पारित केले या सर्व बाबी विसंगत आहे. तसेच ऑक्टोबर व नोव्हेंबर २००७ हया महिन्यांसाठी पुरवठाच करणेत आलेला नाही. पुरवठा न झाल्याने अंगणवाडीतील बालके सदर लाभापासुन वंचीत राहिले आहे. तसेच १६ प्रकल्पांचा वार्षिक पुरवठा बघता कमी जास्त प्रमाणात केलेला दिसतो. हया सर्व बाबी सखोल तपासणी करता अर्धसमासपत्र क्रं. १,२,३ बरोबर जे विवरण सादर केले त्याची माहिती उपलब्ध न केल्याने सविस्तर आक्षेप लिहिता येत नाही तरी याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

---

**परिच्छेद क्रमांक २१:- महिला बालकल्याण विकास प्रकल्प, इगतपुरी अंतर्गत रोगनिदान शिबिरासाठी खरेदी केलेल्या औषधाबाबत.**

| प्र. क्रं. व दिनांक | रक्कम (रु) | तपशिल |
|---|---|---|
| ३०७/३१.३.२००८ | ४४,९९४ | वर्धमान मेडीकल व जनरल स्टोअर्स, इगतपुरी |
| ३०८/३१.३.२००८ | ५,००० | चहा, नाष्टा, मंडप (१० %खर्च) |
| | ४९,९९४ | |

उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

१) वर्धमान मेडीकल व जनरल स्टोअर्स, इगतपुरी यांचेकडुन दिनांक २३.१.२००८ (प्राथमिक आरोग्य केंद्र नांदगाव सदो) व दिनांक २५.२.२००८ ( प्राथमिक आरोग्य केंद्र काननवाडी) या दोन्ही शिबिरांकरीता अनुक्रमे रुपये २२,४९७/- व रुपये २२,४९७/- अशी एकूण रुपये ४४,९९४/- औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. सादर केलेल्या उपप्रमाणकातील बीलामधील तारखेत खाडाखोड करण्यात आलेली आहे. तसेच औषध साठा नोंदवहीत औषधी जमा घेण्यात आल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या औषधांचा विनियोग झाला किंवा कसे याची खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही.

२) बालरोग तज्ञ डॉक्टरांचे कोणते औषधी घ्यावे याबाबतच्या शिफारशी तपासणीस उपलब्ध न झाल्याने केलेली औषधा खरेदी योग्य होती किंवा नाही, याची खात्री करता आली नाही.

३) औषधसाठा नोंदवही न ठेवल्यामुळे शिबीरामध्ये किती औषधे वापरली व किती शिल्लक राहिली याची खात्री करता आली नाही. तरी शिल्लक राहिलेली औषधे तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी प्रमाणित करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

उपरोक्त त्रुटींची पुर्तता होईपर्यंत झालेला खर्च रक्कम रुपये ४४,९९४/- लेखापरीक्षणात तात्पुरती अमान्य करणेत येत आहे.

लेखाशिर्ष
२२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण,
आदिवासी उपयोजना
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ४४,९९४/-
पंचायत समिती इगतपुरी

(विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. ‘ ६ ’ पहा)

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- चलन पावती व साठा नोंदवही उपलब्ध न केलेबाबत.**
**(सुरगाणा)**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभांगातील अंतर्गत सुरगाणा प्रकल्पांतील अंगणवाडी केंद्रांना खालील प्रमाणकाद्वारे ३५८६ किलोग्रॅम थेरोपेटीक फुड (उपचार शास्त्र आहार) दर रुपये २०.६० प्रति किलोप्रमाणे पुरवठा केलेला आहे. सदरचे चलन पावती व साठा नोंदवही लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेले नाहीत.

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | १२९ | ३१.३.२००८ | ३४,५८७ | १६७९ किलो ऑगस्ट / सप्टेंबर ०७ |
| २ | ४३३ | ३१.३.२००८ | ३९,२८४ | १९०७ किलो ऑगस्ट / सप्टेंबर ०७ |
| | | **एकूण** | **७३,८७१** | |

उपरोक्त चलन पावती साठा नोंदवही उपलब्ध न झालेने रक्कम रुपये ७३,८७१/- (३५८६ X २०६०.२०) लेखापरीक्षणांत तात्पुरती अमान्य करणेत येत असून पुर्तता करुन चलन पावती व साठा नोंदवहीतील विनियोग प्रमाणपत्रे व कागदपत्रांसह अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
२२३६ स्थानिक पुरक आहार योजनांतर्गत अनुदान
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ७३,८७१/-

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- चलनपावती उपलब्ध न केलेबाबत.**

एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागातंर्गत मालेगाव प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांना माहे एप्रिल - मे २००७ कालावधीकरीता १७५६३ किलो थेरेपेटीक फुड (उपचारशास्त्रंभूत आहार) दर रुपये २०.६० प्रति किलोप्रमाणे पुरवठा केलेला आहे. त्याकरीता प्रमाणक क्रमांक ४७ दिनांक २४.९.२००७ रक्कम रुपये ३,६१,७९८/- प्रदान केलेली आहे.

मालेगाव प्रकल्पातील करंजगव्हाण गटास १०१४ किलो थेरेपेटीक फुडचा पुरवठा खालील चलनान्वये करण्यात आलेला आहे. तथापि सदरची चलने लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

| अ.क्र. | अंगणवाडी केंद्र | चलन क्रमांक | पुरवठा केलेला आहार (किलो) |
|---|---|---|---|
| १ | वडेल – ३ | ६६८३ | ४० |
| २ | वडेल – ५ | ६६८५ | ४४ |
| ३ | इंदिरानगर (खा) | ६६८६ | १४० |
| ४ | काटेरोड वस्ती | ६६८८ | ३० |
| ५ | गौतमनगर – १ | ६७०० | १६० |
| ६ | गौतमनगर – २ | ६८७० | ६० |
| ७ | पुष्पाताई हिरे नगर | ६६९२ | १४० |
| ८ | दयाने – १ | ६६९३ | १४० |
| ९ | आंबेडकर – ४ | ६६९६ | ६० |
| १० | महात्मा गांधी नगर – १ | ६६९७ | ६० |
| ११ | रमजान पुरा – ७ | ६६९९ | १४० |
| | | **एकूण** | **१०१४** |

उपरोक्त चलन पावती लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने रक्कम रुपये २०,८८८/- (१०१४ × रुपये २०.६० = रुपये २०,८८८) लेखापरीक्षणास तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे. पुर्तता करुन चलने व विनियोगाबाबतचे कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.

लेखाशिर्ष
२२३६ स्थानिक पुरक आहार
योजनांतर्गत अनुदान
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये २०,८८८/-

(पहा विवरणपत्र क्रमांक ४(ब) चा अ.क्र. ८ )

**परिच्छेद क्रमांक २४ :- आक्षेप विवरणपत्र**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची लेखापरीक्षणाचे वेळी पुर्तता करुन घेण्यात आलेने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्र निर्गमीत करण्यात आलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- विवरणपत्र**

या अहवालासोबत आवश्यक ती सर्व विवरणपत्रे जोडण्यात आलेली आहेत. तथापि संबंधित विभागाकडून प्राप्त अनुदान व खर्चाचे विवरण अर्थ विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून प्रमाणित करुन प्राप्त झाले नाही. ते प्राप्त करुन प्राप्त अनुदानाचे अनुषंगाने केलेल्या खर्चाची खात्री पटवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- अनुपालन व पोहच**

या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन, मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० चे कलम १०(१) अन्वेय सादर अहवाल प्राप्त झालेपासुन चार महिन्यांच्या आत जिल्हा परिषदेच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. तसेच सदर अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देण्यात यावी.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर**

१) मा. सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२) मा. सचिव, महिला व बालकल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) मा. आयुक्त, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, मुंबई
४) मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
५) मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
६) मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
७) मा. सहमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**प्रत सस्नेह अग्रेषित :-**

१) म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंचायत राज समिती ), स्थानिक निधी लेखा, मुंबई
२) मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
३) म. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क), जिल्हा परिषद, नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**<u>विवरणपत्र क्रमांक १</u>**

अ) मार्च २००८ अखेर कर्जाचे विवरण (शासनाकडील कर्ज व्याजासह)

**निरंक**

ब) शासनाकडील कर्ज व्याज विरहीत

**निरंक**

---

**<u>विवरणपत्र क्रमांक २ व ३</u>**

सन २००७ - २००८ मध्ये प्राप्त झालेले अनुदान व खर्च विवरण मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडून स्वाक्षरीने पडताळणी करुन प्राप्त झालेले नाही. ते प्राप्त करुन प्राप्त अनुदान व खर्चाची खात्री पटवावी.

## विवरणपत्र क्रमांक ४ (अ)

## अंतिम अमान्य रक्कमांचा तपशिल सन २००७ – २००८

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | संक्षिप्त तपशील | आस्थापना | सप्रयोजन | योजना | अभिकरण योजना | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | योजनांतर्गत | योजनेतर |
| १ | २ | बेकायदेशीर फोल्डींग काथ्याच्या गाद्या खेरदीबाबत | ० | - | - | ७१००२८३ | - |
| २ | ७ | बॉश पंप दुरुस्तीबाबत | ० | - | - | ३७८० | - |
| ३ | ८ | उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील जादा रक्कम प्रदानाबाबत. | ० | - | - | २५७५ | - |
| ४ | ९ | जादा किलोमीटर नमुद केल्याबाबत | ० | ४३५२ | - | ० | - |
| ५ | १० | उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्यातील अनियमततेबाबत | ० | - | - | १५४५० | - |
| ६ | १२ | उपचारशास्त्रंभूत आहार पुरवठ्याची अंगणवाडीला दुबार प्रदानाबाबत. | ० | - | - | २०८१ | - |
| ७ | १३ | उपचारशास्त्रंभुत पुरवठ्यातील जादा रक्कम प्रदानाबाबत | ० | - | - | ८८३६ | - |
| ८ | १५ | सेवा प्रवेशोत्तर परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण नसतांना नियमबाह्यपणे पुढील वेतनवाढी दिलेबाबत | ६५८९८ | - | - | ० | - |
| ९ | १६ | अतिरिक्त घरभाडे भत्ता जादा अदा केलेबाबत. | २७२० | - | - | ० | - |
| १० | १७ | पोषण आहार पुरवठा करणा-या बचतगटांना झालेल्या दुबार प्रदानाबाबत | ० | - | - | ५६११ | - |
| ११ | १८ | प्रवासभत्ता देयकातील अनियमित प्रदानाबाबत | २८५६ | - | - | ० | - |
| १२ | १९ | नियमबाह्य खर्चाबाबत | ७५०० | - | - | ० | - |
| | | **एकूण :-** | **७८९७४** | **४३५२** | | **७१३८६१६** | |

## विवरणपत्र क्रमांक ४ (ब)
## तात्पुरत्या अमान्य रक्कमांचा तपशिल सन २००६ - २००७

| अ. क्र. | परिच्छेद क्रमांक | संक्षिप्त तपशील | आस्थापना | सप्रयोजन | योजना | अभिकरण योजना | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | योजनांतर्गत | योजनेतर |
| १ | ३ | महिलाच्या स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत अंगणवाड्यातील लाभार्थ्यांना पुरकपोषण आहार पुरवठा | - | - | - | ३६२९६५३ | - |
| २ | ४ | महिलाच्या स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत अंगणवाड्यातील लाभार्थ्यांना पुरकपोषण आहार पुरवठा | - | - | - | ४५६६०७७ | - |
| ३ | ५ | महिलाच्या स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत अंगणवाड्यातील लाभार्थ्यांना पुरकपोषण आहार पुरवठा | - | - | - | ४८०४२७६ | - |
| ४ | ६ | महिलाच्या स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत अंगणवाड्यातील लाभार्थ्यांना पुरकपोषण आहार पुरवठा | - | - | - | ५९३१५७१ | - |
| ५ | १३ | उपचारशास्त्रंभूत पुरवठ्यातील जादा रक्कम प्रदानाबाबत | - | - | - | ३५५५१७ | - |
| ६ | २१ | महिला बाल कल्याण विकास प्रकल्प इगतपुरी अंतर्गत रोगनिदान शिबिरासाठी खरेदी केलेल्या औषधांबाबत. | - | - | - | ४४९९४ | - |
| ७ | २२ | चलनपावती व साठा नोंदवही उपलब्ध न केलेबाबत | - | - | - | ७३८७१ | - |
| ८ | २३ | चलनपावती उपलब्ध न केलेबाबत | - | - | - | २०८८८ | - |
| | | **एकूण :-** | | | | **१९४२६८४७** | |

**विवरणपत्र क्रमांक - ५**

अपूर्ण कामे

**निरंक**

---

**विवरणपत्र क्रमांक - ६ व ७**

अग्रिम व अनामत

**निरंक**

---

**विवरणपत्र क्रमांक - ८**

गुंतलेल्या रक्कमा

| अ.क्र. | परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | ११ | १७०.०० |

---